दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.२२ एप्रिल २०२५ |वर्ष४थे| अंक२५०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या बिंदूनामावलीत घोटाळा!





**७६४१ पदावरील आरक्षण २०२२-२३**

| जात | प्रवर्ग | मान्य पदे | कार्यरत | कमी-अधिक |
|---|---|---|---|---|
| अ.जा. | १३% | ९९३ | ९४६ | ४७ रिक्त |
| अ.ज. | ७% | ५३५ | ३१४ | २२१ अति |
| विजाअ | ३% | २२९ | ३२६ | ९७ अति |
| भजव | २.५% | १९१ | २०३ | १२ अति |
| भजक | ३.५% | २६७ | ३७२ | १०५ अति |
| भजड | २% | १५३ | ६०१ | ४४८ अति |
| विमाप्र | २% | १५३ | १६२ | ९ अति |
| इमाव | १९% | १४५२ | १२२१ | २३१ अति |
| अराखिव | ४८% | ३६६८ | ३६४८ | १५२ अति |

**सीईओंनी लक्ष देणं गरजेचं**

बीड जिल्हा परिषदमध्ये बिंदू नामावलीचा घोळ गेल्या अनेक वर्षापासून होतो आहे. त्यामुळे अन्य प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होतो आहे. ही बाब नियमांचे उल्लंघन करणारी आहे.त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, हक्काच्या जागेवर कब्जा करून बसलेल्या उमेदवारांना हाकलून देऊन, बिंदू नामावलीचे काटेकोरपणे पालन करावे अशी मागणी होत आहे.

- कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे नेते धम्मपाल उघडेंची तक्रार
- ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गातील उमेदवारांना बसला फटका
- बिंदूनामावलीचे नियम डावलून मनमानी कारभाराचा कळस
- उपमुख्यमंत्री अजित पवारांनी बैठक घेतली खरे पण पुढे काय?

## बैठक झाली खरे पण पुढे काय?

मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या प्रकाराच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या अध्यक्षतेखालील समिती नेमण्यात आली. याची पहिली बैठक शुक्रवार, दि. २८ मार्च रोजी झाली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आदींची उपस्थिती होती. २०१५ पासून २०१६, २०१९, २०२२-२३ या सालात शासनाच्या विविध विभागांत भरत्या झाल्या. त्यासह जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या अंतरजिल्हा बदली, पदोन्नती, अनुकंपा भरती करताना बिंदूनामावलीचे पालन झाले का, याची माहिती घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

पुण्यभूमी प्रतिनिधीं

बीड:जिल्ह्यात जिल्हा परिषद, शिक्षण विभागात नोकर भरती, जिल्हा बदली, पदोन्नती करताना बिंदूनामावली पाळली गेली का, असा प्रश्न पून्हा उपस्थित होतो आहे. कारण मागच्या अनेक वर्षांपासून जिल्हा परिषद शिक्षण या विभागांत बिंदूनामावलीचे पालन करण्यात आलेले नाही. त्याचा फटका खुल्या, ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गातील उमेदवारांना बसला आहे.त्यामुळे बिंदूनामावलीचे पालन करुन आम्हाला न्याय देण्यात यावा.असे निवेदन कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे मराठवाडा विभाग अध्यक्ष तथा कार्यकरिणी सदस्य धम्मपाल उघडे यांनी,विभागीय आयुक्त यांना दिले आहे.



बीड जिल्हा परिषद सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते.आता पून्हा एकदा बिंदूनामावली प्रश्न चर्चेत आला आहे. कारण जिल्हा परिषद शिक्षण विभागात » पान २ वर

## मुख्य आरोपी अभय कुरुंदकरला जन्मठेप

### अश्विनी बिद्रे हत्याकांड प्रकरण; पनवेल सत्र न्यायालयाचा निकाल

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई :बहुचर्चित सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणी मुख्य आरोपी अभय कुरुंदकर याला पनवेल सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा तसेच २० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर, सहआरोपी कुंदन भंडारी आणि महेश फाळणीकर या दोघांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. तथापि, या दोघांच्या शिक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे या दोघांची सुटका करण्यात येणार आहे. तर अन्य संशयित राजू पाटील याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.

अश्विनी बिद्रे हत्याकांड प्रकरणात अखेर पनवेल सत्र न्यायालयाने निकाल दिला आहे. मुख्य आरोपी अभय



कुरुंदकरला जन्मठेपेची शिक्षा आणि हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. उर्वरीत दोन आरोपींना ७ वर्षांची शिक्षा सुनावली. कुंदन भंडारी आणि महेश पार्डीकर या दोघांना ७ वर्षांची शिक्षा सुनावली. पण या दोन आरोपीची शिक्षा पूर्ण झाल्याने त्यांना तुरुंगातून सोडण्याचे कोर्टाने आदेश दिले आहेत. दरम्यान, अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणी नऊ वर्षानंतर आरोपींना » पान २ वर

## पोप फ्रान्सिस यांचे निधन

### आदरांजली:वयाच्या ८८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:पोप फ्रान्सिस यांचे निधन झाल्याची माहिती व्हॅटिकनकडून देण्यात आली आहे. सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांचे निधन झाले. त्यांनी त्यांचेसंपूर्ण आयुष्य रोम येथील चर्चच्या सेवेसाठी वेचले. पोप फ्रान्सिस यांनी आपल्याला आयुष्यातली मूल्यं शिकवली. तसंच धैर्य आणि प्रेम यांचा संदेश दिला असे म्हणत व्हॅटिकनने या संदर्भातले वृत्त दिले आहे. व्हॅटिकनकडून एक व्हिडीओ संदेश देण्यात आला. त्या संदेशात पोप फ्रान्सिस यांच्या निधनाचें वृत्त देण्यात आले. पोप फ्रान्सिस यांचं सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी निधन रोमन कॅथलिक चर्चचे पहिले लॅटिन अमेरिकन पोप फ्रान्सिस यांचं निधन झाले. त्यांच्या फुफ्फुसांमध्ये न्यूमोनिया » पान २ वर

### आध्यात्मिक धैर्य यांचे प्रतीक: पंतप्रधान मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे की, पवित्र पोप फ्रान्सिस यांच्या निधनाने मला अतिशय दु:ख झाले आहे. या दु:खाच्या आणि आठवणीच्या क्षणी, जागतिक कॅथोलिक समाजाला माझ्या मनापासून संवेदना. जगभरातील कोट्यवधी लोकांसाठी पोप फ्रान्सिस हे करुणा, नम्रता आणि आध्यात्मिक धैर्य यांचे प्रतीक म्हणून सदैव स्मरणात राहतील. लहान वयातच त्यांनी प्रभु येशू ख्रिस्तांच्या तत्त्वांचा प्रसार करण्यासाठी स्वत:ला अर्पण केले. त्यांनी गरिबांसाठी, उपेक्षितांसाठी अपार सेवा केली. दु:खित आणि पीडित लोकांमध्ये त्यांनी आशेचा किरण जागवला. माझ्या त्यांच्याशी झालेल्या भेटी मला नेहमीच प्रिय राहतील. सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या असलेल्या बांधिलकीने मला फार प्रेरणा दिली. भारतातील जनतेप्रती असलेले त्यांचे प्रेम सदैव सन्मानाने स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

## भारतीय विद्यार्थ्यांचा व्हिसा रद्द

### देशविदेश:काँग्रेसने व्यक्त केली चिंता, सरकारला सवाल

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार अमेरिकेने ज्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द केले किंवा स्टुडंट अ‍ॅण्ड एक्स्चेंज व्हिजीटर इन्फॉर्मेशन सिस्टममधून नोंदणी रद्द केली, त्यापैकी सुमारे ५० टक्के विद्यार्थी भारतातील आहेत. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला असून, केंद्र सरकार यावर ठोस पावले उचलणार का, असा सवाल उपस्थित केला आहे.

अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने विद्यार्थी, वकील आणि विद्यापीठ कर्मचा-यांकडून



या प्रकरणावर ३२७ अहवाल गोळा केले. यातून ही माहिती समोर आली. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १४ टक्के विद्यार्थी चीनचे आहेत. याशिवाय दक्षिण कोरिया, नेपाळ आणि बांगलादेशातील » पान २ वर

**राजकीय** | **तिकडे पवार काका-पुतण्यांमध्ये भेट**

## महाराष्ट्रात राजकीय भूकंप होणार?

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना दिलेली साद आणि त्यावर उद्धव ठाकरेंनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद हे सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. अशातच आज आणखी महत्वाची बैठक पवार कुटुंबात पार पडली. महिनाभरातवेगवेगळ्या कार्यक्रमानिमित्त ४ वेळा भेट झाली आहे. त्यामुळे ठाकरे बंधूंपाठोपाठ आता पवार काका-पुतणेही एकत्र येणार का? अशी चर्चा रंगली आहे. अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, वंसतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कामकाजासंबंधीत एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शरद पवार आणि अजित पवारांसोबत इन्स्टिट्यूटचे काही



अधिकारी देखील उपस्थित होते. या बैठकीनंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात वेगळी बैठकही झाली. या बैठकीत नेमकी काय चर्चा रंगली? याचं उत्तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.

### आमचे प्रेमही तितकेच :राऊत

शरद पवार आणि अजित पवार यांची या याच पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले की, ते एकत्र आलेलेच आहेत. आम्हाला आतापर्यंत कोणाला भेटताना तुम्ही पाहिलात का? बोलताना, चहा पिताना पाहिलत का? एकत्र व्यासपिठावर नाही. आम्ही नाही भेटणार. आमच्याकडे काही वसंतदादा शुगर इंस्टीट्यूट नाही. आमच्याकडे रयत शिक्षणसंस्था नाही. आमच्याकडे काहीच नाही आहे. असे आमच्याकडे नाही आहे. तो त्यांचा प्रश्न आहे. आमचे प्रेमही तितकेच आहे आणि कडवटपणाही तितकाच असतो आणि त्यात भेसळ नसते. » पान २ वर

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास आनंद : रोहित पाटील

राज्यात उद्धव आणि राज ठाकरेंच्या मनोमिलनाचे वारे वाहत असताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास आनंद होईल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तसेच सर्व संघटना एकत्र येऊन काम केल्यास महाराष्ट्रात एक मजबुती निश्चितपणाने येईल,असा विश्वास देखील आमदार रोहित पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते सांगलीमध्ये बोलत होते.

## अणुबॉम्बपेक्षा महाविध्वंसक अस्त्र निर्मितीत चीनला यश

### चिंता:नॉन न्यूक्लियर हायड्रोजन बॉम्बचा भारताला धोका

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:चीनने एक शक्तिशाली नॉन न्यूक्लियर हायड्रोजन बॉम्बची यशस्वी चाचणी केली आहे. अवघे दोन किलो वजन असलेल्या या बॉम्बमुळे जगभरातील शस्त्रास्त्र स्पर्धेला नवे वळण लागण्याची शक्यता आहे. हा बॉम्ब मॅग्नेशियम हायड्राइड नावाच्या एका स्थायूरूप हायड्रोजन सामुग्रीचा वापर करतो. त्यामुळे तो परंपरागत विध्वंसक अण्वस्त्रांपेक्षा वेगळा आहे. हा नॉन न्यूक्लियर हायड्रोजन बॉम्ब पारंपरिक अणुबॉम्बपेक्षा वेगळा आहे. यामध्ये अणुविखंडन किंवा फिशन रिॲक्शन होत नाही. तसेच या बॉम्बमुळे आंतरराष्ट्रीय अणुकराराचे उल्लंघनही होत नाही.



चिनी संशोधकांनी केलेल्या दाव्यानुसार हा बॉम्ब अगदी कमी खर्चामध्ये विकसित करता येतो. तसेच या बॉम्बपासून फारसा किरणोत्सर्गही होत नाही. मात्र या बॉम्बच्या स्फोटामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे आता » पान २ वर

## तुझे नी माझे व्हावे मिलन

'गंध फुलांचा गेला सांगून, तुझे नी माझे व्हावे मिलन' असे एक गीत आहे. फुलांचा गंध संपण्याची वेळ आली, फुले कोमेजून जाऊ लागली; परंतु मिलन काही होत नाही. महाराष्ट्रातील दोन नेत्यांची, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या ठाकरे बंधूंची अशीच प्रतिकात्मक स्थिती झाली आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार का? असा सवाल गत अनेक वर्षापासून सतत विचारला जात आहे. अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या 'वास्तव द ट्रूथ' या यूट्युब चॅनेलसाठी राज ठाकरे यांची मुलाखत घेताना पुन्हा तोच प्रश्न विचारण्यात आला आणि शिळ्या कढीला ऊत आला. राज ठाकरे यांनी राजकारणाला शोभेल असे उत्तर देताना म्हटले की, आमच्यातील वाद, भांडणे छोटी आहेत. त्या वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे त्यामुळे एकत्र येणे कठीण नाही; पण विषय इच्छाशक्तीचा आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी भारतीय कामगार सेनेच्या कार्यक्रमात या प्रस्तावावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, आमच्यातील किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला तयार आहे मात्र महाराष्ट्राच्या हितासाठी युती करायची की भाजपसोबत जायचे, हे स्पष्ट करायला हवे.चोरांना पाठिंबा नाही ही शिवरायांची शपथ घ्या. राज आणि उद्धव कधीही एकत्र येणार नाहीत, असे काही जणांचे मत आहे तरीही सतत हा विषय काढून त्यावर वक्तव्य करत प्रसिद्धी मिळवण्याची काही जणांना हौस आहे, असो. महेश मांजरेकरांच्या यूट्युब चॅनेलसाठी मुलाखत घेताना मांजरेकरांनी उद्धव ठाकरे आणि तुमची युती होऊ शकते का? असा प्रश्न विचारला. त्यावर राज म्हणाले, आमच्यातले वाद किरकोळ आहेत आणि महाराष्ट्र खूप मोठा आहे. महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी बाकी सा-या गोष्टी क्षुल्लक आहेत. आपण लार्जर पिक्चर बघणे गरजेचे आहे. एकत्र येणे आणि एकत्र राहणे फार कठीण आहे, असे मला वाटत नाही. माझ्या इच्छेचा आणि स्वार्थाचा प्रश्न नाही. शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर माझा विचार होता की, आपण बाळासाहेब सोडून कोणाच्या हाताखाली काम करायचे नाही; परंतु मी शिवसेनेत होतो तेव्हा माझी उद्धव सोबत काम करण्यास काहीच हरकत नव्हती. आमची युती व्हावी, अशी महाराष्ट्राची इच्छा असेल तर महाराष्ट्राने त्यांना (उद्धव ठाकरेंना) जाऊन सांगावे. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये मी माझा इगो कधी आणत नाही, आणलाही नाही.

उद्धव ठाकरे यांनीही राज ठाकरे यांच्या प्रस्तावावर लगेच आपली भूमिका स्पष्ट केली. दादरच्या शिवाजी महाराज स्मृती मंदिरात कामगार सेनेच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे म्हणाले, मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी अगदी किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मीसुद्धा तयार आहे. मी मराठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी सर्व मराठी माणसांना एकत्र येण्याचे आवाहन करतो; पण माझी एक अट आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी हे लोक महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला घेऊन जात होते तेव्हाच तुम्ही विरोध केला असता तर आज हे सरकार दिल्लीत बसले नसते. आम्ही महाराष्ट्राच्या हिताचा विचार करणारे सरकार केंद्रात बसवले असते. महाराष्ट्रातसुद्धा आपल्या महाराष्ट्राचा विचार करणारे सरकार बसले असते. त्याच वेळी हे काळे कामगार कायदे कच-याच्या पेटीत फेकून दिले असते; पण तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा, मग परत तडजोड करायची हे असे चालणार नाही.

महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कोणी येईल त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, त्याच्या घरी जाणार नाही, हे पहिल्यांदा ठरवा. त्यानंतर महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. जी होती ती आजच मी मिटवून टाकली. कुणासोबत गेल्यानंतर महाराष्ट्राचे, मराठी व हिंदुत्वाचे हित होणार हे ठरवा मग पाठिंबा द्यायचा की विरोध करायचा हे ठरवा. महाराष्ट्राचे हित ही माझी एकच अट आहे. मराठीच्या मुद्यावर एकमत असलेले; पण एकमेकांपासून दूर असलेले ठाकरे बंधू कधी एकत्र येणार? अशी उत्सुकता राज्यातील तमाम शिव आणि मनसैनिकांना लागून राहिली आहे. अनेकदा टाळी देण्याचे प्रयत्न झाले; पण हे बंधू एकत्र येण्याची चिन्हे दिसत नव्हती; पण सध्या स्वत:च्याच अस्तित्वासाठी लढणा-या उद्धव आणि राज ठाकरे यांनी आता मात्र एकमेकांना पुन्हा एकदा टाळी देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे राज्याचे राजकारण पुन्हा एकदा वेगळे वळण घेण्याची शक्यता असून ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता दुणावली आहे. राजकारणात काहीही होऊ शकते त्यामुळे राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो, असे म्हटले जाते. त्यानुसार गत दोन दशकांहून अधिक काळ वेगवेगळी चूल मांडणारे राज आणि उद्धव ठाकरे यांची आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी युती होऊ शकते, असे संकेत आहेत. दोन्ही ठाकरे एकत्र आले तर आम्हाला आनंदच होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोणीही आपल्यातील मतभेद विसरून एकत्र येत असतील तर त्यामध्ये कोणीही वाईट वाटण्याचे कारण नाही, असे ते म्हणाले. ऑफर देणारे आणि त्याला प्रतिसाद देणारे यांच्या बाबत मला जास्त विचारण्यापेक्षा त्यांनाच विचारले पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले. मनसे आणि शिवसेना ठाकरे या दोन्ही पक्षांनी काय भूमिका घ्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे.राज आणि उद्धव यांनी एकत्र यावं की नाही या बाबत दुस-या कोण्या राजकीय पक्षाने सांगण्याचे काही कारण नाही. प्रत्येकाने आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून जे त्यांना योग्य वाटते, तो निर्णय त्यांनी घ्यावा, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. उद्धव आणि राज या दोन्ही भावांनी एकत्र यावं ही लोकभावना आहे. एकत्र आल्यास त्याचा महापालिकेत चांगला परिणाम होऊ शकतो, असे जनमत आहे. सध्या मुंबईत इतर भाषिकांची सुरू असलेली दादागिरी, वाद यामुळे मराठी माणूस नाराजच नाही तर संतापलेला आहे. त्यांना एका चांगल्या पर्यायाची प्रतीक्षा आहे म्हणून गंध, फुले ओरडून सांगताहेत तुमचे व्हावे मिलन!

# धुळीमुळे पाटोदाकरांचे आरोग्य धोक्यात!

## बोंबला:पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम संथगतीने



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ चे काम गेल्या कित्येक महिन्यांपासून अत्यंत संथ गतीने सुरू आहे. पाटोदा शहरातील मांजरा नदीवरील पूल तसेच राज मोहम्मद चौक मार्गावरील रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असून, काम वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे आणि धुळीवर नियंत्रणासाठी कोणतीही उपाययोजना न केल्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

रोजच्या वाहतुकीमुळे उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे विकार, डोळ्यांची जळजळ, त्वचेचे त्रास तसेच दमा आणि ॲलर्जीच्या तक्रारी झपाट्याने वाढत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पूर्वीपासून आजारी असलेल्या नागरिकांना याचा मोठा त्रास होत आहे.महामार्गाचे काम अनाठायीपणे लांबणीवर पडत असल्याने ठेकेदार कंपनी आणि संबंधित विभाग यांच्यावर निष्काळजीपणाचे आरोप होत आहेत. अपूर्ण रस्ता, विखुरलेली माती आणि असुरक्षित कामाची परिस्थिती यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून, पादचाऱ्यांना आणि दुचाकीस्वारांना रोजच्या प्रवासात जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे.

### नागरिकांची प्रमुख मागणी

महामार्गाचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे.काम पूर्ण होईपर्यंत नियमितपणे पाण्याची फवारणी करून धूळ नियंत्रणात आणावी.आरोग्य विभागाने विशेष वैद्यकीय शिबिरे आयोजित करावीत.ठेकेदार कंपनीवर प्रशासनाने दंडात्मक कारवाई करावी.शासनाचा ठोस पाठपुरावा आवश्यक पाटोदा तालुक्याचे लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची वेळ आली आहे. महामार्गाचे काम दर्जे दार आणि वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी जनतेने संघटित होऊन आवाज उठविणे आवश्यक आहे. शासनाच्या यंत्रणांनीही ठेकेदार कंपन्यांवर कडक कारवाई करत या कामाचा वेग वाढवावा, हीच नागरिकांची ठाम मागणी आहे.

# रबी अहमदला नाशिकमध्ये तिसरे राष्ट्रीय रौप्य पदक

नाशिक:वर्ल्ड बॉक्सिंग कौन्सिल, जागतिक मुआय थाय फेडरेशन इंडिया आणि ऑल इंडिया मिक्स्ड मार्शल आर्ट्स फेडरेशन इंडिया यांच्या मान्यतेने प्रायमल कंटेन्डर सिरीज २ आणि नाशिक एमएमए क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एमएमए फायटिंग नॅशनल चॅम्पियनशिप २०२५ मध्ये मिल्लीया सीनिअर कॉलेज चे शेख रबी अहमद शेख अब्दुल रहीम (गुलाम साकिब) यांना रौप्य पदक मिळाले. ते केरळच्या सियाम वॉरियर फाईट क्लबकडून खेळत होते, तर त्यांची लढत गोवा येथील रहीम फायटर फॅक्टरी क्लबचे सर्वोत्तम गोल्ड मेडलिस्ट सोनू शर्मा यांच्याशी झाली. या सामन्यात सोनू शर्मा यांना सवर्ण आणि रबी अहमद याला त्यांचा करिअरचा तिसरा राष्ट्रीय रौप्य पदक मिळाला. त्यांच्या रेकॉर्ड मध्ये ४ राष्ट्रीय ब्राँझ मेडलस् पण नोंदिकृत आहे. शेख रबी अहमद यांना आयोजक झायेन खान, मॅनेजिंग डायरेक्टर हिरो एमएमए क्लब नाशिक आणि मुंबईच्या व्हायपर ३६० क्लबचे मॅनेजिंग डायरेक्टर झिशान सर यांनी अभिनंदन केले आणि रौप्य पदक प्रदान केले. त्यांच्या या यशाबद्दल मित्र आणि नातेवाईकांमध्ये आनंदाची लहर पसरली आहे. विशेष म्हणजे, नाशिकच्या हिरो एमएमए क्लबच्या रिंगणात देशातील अनेक मोठ्या खेळाडूंनी एमएमए फायटिंग खेळण्याचा मान मिळवला आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत नागालँड, मणिपूर, मिझोराम, सिक्कीम, केरळ, दिल्ली, पंजाब, बऱ्हाणपूर (मध्य प्रदेश), उत्तर प्रदेश, मुंबई, पुणे (महाराष्ट्र), गोवा, ओडिशा, गुजरात, बंगळूरु (कर्नाटक), आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांतील व शहरांतील एमएमए खेळाडूंनी सहभाग घेतला होता.





## पान एक वरून

### बीड जिल्हा परिषद शिक्षण

नोकरभरती, बदली,पदोन्नती करत असताना बिंदूनामावलीचे नियम डावलले आहेत. त्यामुळे त्याचा सर्वात जास्त फटका खुल्या, ओबीसी, एससी, एसटी वर्गाला बसला आहे.त्यामुळे कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे नेते, धम्मपाल उघडे यांनी विभागीय आयुक्तांना निवेदन देवून बिंदूनामावलीत कसा घोटाळा झालेला आहे, ही बाब उघड केली आहे.

त्यामुळे बीड जिल्हा परिषद पून्हा चर्चेत आली आहे.धम्मपाल उघडे यांनी निवेदनात असही म्हंटल आहे की, बिंदुनामावली नुसार जुन २०२५ अखेर रिक्त पदांनुसार उपलब्ध व्हावी. तसेच अनु जाती व अनुसूचित जमाती यांची शिक्षक संख्या भारतीय संविधानाच्या नियमानुसार निर्धारित केलेल्या प्रमाणे असावी. इतर विशिष्ट प्रवर्गातील शिक्षकांमुळे पात्र जाती व अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गावर अन्याय होणार नाही याची आपण काळजी घ्यावी. जिल्हा परिषद बीड अंतर्गत बिंदुनामावली वस्तुनिष्ठ प्रकारे होवून आम्हास जागा उपलब्ध व्हावी,अशी मागणी धम्मपाल उघडे यांनी विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

### मुख्य आरोपी अभय कुरुंदकरला

शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या प्रकरणातील चार आरोपींपैकी प्रमुख आरोपी बडतर्फ वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकरला पनवेल सत्र न्यायालयाने ५ एप्रिल २०२५ रोजी दोषी ठरवले होते. तर, उर्वरित कुंदन भंडारी आणि महेश फाळणीकर या दोघांनी कुरुंदकर याला मदत केल्याने त्यांचा सहभाग असल्याचे न्यायालयाने निकाल देताना स्पष्ट केले होते. तथापि, या प्रकरणातील अन्य आरोपी आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांचा भाचा राजू पाटील याने चुकीच्या कार्यात मदत केली असली तरी त्याबाबतचे कोणतेही पुरावे सादर करण्यात न आल्याने सबळ पुराव्या अभावी त्याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली होती. अश्विनी बिद्रे यांच्या पतीने राजू गोरे यांनी आरोपींकडून भरपाई नको असे सांगितले होते. त्यामुळे तसा आदेश काढण्यात आलेला नाही. सरकारला कोर्टाकडून सूचना देण्यात आल्या आहेत की त्यांच्या पगाराची भरपाई देण्यात यावी. ज्या अधिका-यांनी निष्काळजीपणा केला त्यांच्यावरही कारवाई करावी असा नवी मुंबई पोलीस आयुक्तांना आदेश देण्यात आला आहे. ज्या अधिका-यांनी अक्षम्य हलगर्जीपणा केला, अशा अधिका-यांवर कारवाई होणार. अधिका-यांवर विभागीय शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस. तत्कालीन पोलीस आयुक्त हेमंत नागराळे यांनीही यामध्ये दुर्लक्ष केल असल्याचे कोर्टाचे मत आहे. आरोपींविरोधात कारवाई न करता, चौकशी न करता आरोपींच्या राष्ट्रपती पदकासाठी शिफारस करणारे अधिकारी अडचणीत आले आहेत. या निकालाविरोधात वरच्या कोर्टात दाद मागण्यासाठी आरोपींना तीन दिवसांची मुभा देण्यात आली आहे.

### पोप फ्रान्सिस यांचे

संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील जेमेली रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती पण नंतर हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आज सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांची प्राणज्योत मालवली.कार्डिनल जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ यांची २०१३ मध्ये बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवड झाली होती. त्यांना पोप फ्रान्सिस म्हटले जाते. पोपपदी येणारे युरोपबाहेरचे ते पहिले पोप ठरले होते. २६६ व्या पोपपदी त्यांची निवड झाली त्यावेळी सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. रोमन कॅथलिक चर्चचे नेतृत्व करताना १२ वर्षांच्या काळात पोप फ्रान्सिस यांना अनेकवेळा रुग्णालयात दाखल व्हावे लागले. तसंच अनेक वैद्यकीय समस्यांचा सामनाही करावा लागला. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांचं एक फुफ्फुस काढावं लागलं होतं. मार्च २०२३ मध्ये त्यांना ब्राँकायटिसमुळंच तीन दिवस रुग्णालयात दाखल राहावं लागलं होतं. त्यानंतर जून महिन्यात त्यांच्यावर हर्नियाची शस्त्रक्रियाही करण्यात आली. आणखी एका आजारपणामुळं त्यांना २०२३ मध्ये यूएईमध्ये झालेल्या हवामान परिषदेलाही उपस्थित राहता आले नव्हते. आतापर्यंतचे सर्व पोप हे व्हॅटिकन सिटीतील भलेमोठे पेंट हाऊस अपार्टमेंट वापरत असत. परंतु, पोप फ्रान्सिस यांनी ते पेंट हाऊस नाकारले आणि स्वत:साठी गेस्ट हाऊसमधील छोटंसं घर निवडले होते. त्यामुळे त्यांच्या या निर्णयाचीही चर्चा झाली होती. पोप फ्रान्सिस यांनी जागतिक अर्थव्यवस्थेत परवलीचा शब्द असलेल्या मुक्त-बाजार या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. चर्चने समलिंगी लोकांबद्दल मत बनवण्यापेक्षा त्यांची माफी मागितली पाहिजे असं वक्तव्य केलं होतं. त्यांच्या या भूमिकांमुळेही ते चर्चेत राहिले.

### भारतीय विद्यार्थ्यांचा

विद्यार्थ्यांचाही व्हिसा रद्द करण्यात आला आहे. यामध्ये भारतीयांची संख्या मोठी आहे.२०२३-२४ च्या आकडेवारीनुसार अमेरिकेत परदेशातील सर्वाधिक विद्यार्थी भारतातील आहेत. २०२३-२४ मध्ये ११,२६,६९० आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी ३,३१,६०२ विद्यार्थी भारतातील होते. हे प्रमाण एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या २९ टक्के आहे. त्यानंतर चीनचा क्रमांक लागतो. चीनच्या विद्यार्थ्यांची संख्या २.७७ लाख आहे. ज्या विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द झाले, त्यापैकी ५० टक्के विद्यार्थी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंगवर होते. अर्थात, ते पदवीधर असून, ते अमेरिकेत नोकरी करीत आहेत.

ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग एफ-१ व्हिसाची १२ महिने मुदत: ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग एफ-१ व्हिसावर अमेरिकेत असलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना १२ महिन्यांपर्यंत काम करण्याची परवानगी मिळते. यानंतर जे विद्यार्थी विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात काम करतात, त्यांना व्हिसामध्ये आणखी २४ महिन्यांची मुदतवाढ मिळते.

### अणुबॉम्बपेक्षा महाविध्वंसक अस्त्र

चीनकडे अणुबॉम्बपेक्षा धोकादायक असे भयंकर हत्यार लागले आहे. हा बॉम्ब स्फोट झाल्यानंतर १००० डिग्री सेल्सियसहून अधिक तापमानाचा आगीचा गोळा तयार करतो. तो सर्वसाधारण टीएनटी स्फोटाच्या तुलनेत १५ पट अधिक वेळेपर्यंत टिकतो.प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे चीन या हत्याराचा वापर सीमाभागात करू शकतो. त्यामुळे या बॉम्बचा भारताला मोठा धोका आहे. दुसरीकडे चीनने आपल्या लष्करी सामर्थ्याला एआय, ड्रोन स्वार्म, हायपरसोनिक क्षेपणास्त्रे आणि नॉन न्यूक्लियर रणनीतिक हत्यारांनी सज्ज करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे भारतालाही आपल्या शस्त्र क्षमतेची तुलना चीनसोबत करून आगेकूच करावी लागेल.

### महाराष्ट्रात राजकीय भूकंप

पवार कुटुंबातील साखरपुडा कार्यक्रमात अजित पवार आणि शरद पवार एकत्रित भेटल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली होती. यावर अजित पवार म्हणाले, 'साखरपुडा कार्यक्रम हा पुर्णत: पवार कुटुंबाचा वैयक्तिक आणि कौटुंबिक विषय आहे. इतरांनी त्यावर चर्चा करणे योग्य नाही. हा कुटुंबाचा अंतर्गत विषय आहे. त्याचा राजकारणाशी काहीही संबंध नाही. पवार विविध संस्थात्मक कार्यक्रमांमध्ये हजेरी लावत असतात. त्यामागील उद्देश नेहमीच सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती असतो, असं अजित पवार यांनी स्पष्ट केलं. राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र बसणे गरजेचं 'आज पार पडलेली बैठक देखील महत्वाची होती. ज्यामध्ये कृषी आणि शिक्षण क्षेत्रात एआयचा कसा प्रभावी वापर करता येईल, यावर सखोल चर्चा झाली. शेतक-यांना थेट फायदा होईल, अशा तंत्रज्ञानाचा वापर केला जावा, असा ठाम विचार या बैठकीतून समोर' आल्याचंही अजित पवार यांनी सांगितलं. तसेच अशावेळी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र बसणे गरजेचं असतं, असंही पवार म्हणाले.

## पान सहा वरून

### शिवसंग्रामची पुणे येथून ठरली

देशमुख यांची हत्या निंदनीय असून, हत्येप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी सुरुवातीपासून करत आहे. यातील आरोपींना अटक झाली आहे. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बीडच्या जनतेप्रमाणे आम्हालाही प्रशासन चांगले काम करेल, अशी आशाआहे. अजित पवार यांचा प्रशासनावर वचक असून, अपेक्षेप्रमाणे काम होत असल्याचे दिसून येत आहे. अंबाजोगाईमध्ये वकील महिलेलाझालेली मारहाण चीड आणणारी आहे. अशा घटनांमुळे बीडचीप्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे पोलिसांनी गुन्हा करणारा राजकीय पक्षाचा कार्यकर्ता किंवा पदाधिकारी याकडे न पाहता कठोर कारवाई करावी, अशीच आमही मागणी आहे.आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत शिवसंग्रामचीभूमिका त्यावेळी जाहीर करू. आता शेतकऱ्यांचे, महिलांचे प्रश्न सोडवण्यालाप्राधान्य देत आहोत. तसेच राज्यभरात शिवसंग्रामचीसदस्य नोंदणी मोहीम सुरु असून, पक्षबांधणीवरभर दिला जात आहे. प्रत्येक जिल्ह्यात अधिकाधिक संख्येने शिवसंग्राम पक्षातलोकांना सामावून घेतले जात असल्याचेही मेटे यांनी सांगितले.यावेळी भगवान बाजीराव लंबे जिल्हाध्यक्ष बुलढाणा, धनंजय बाजड जिल्हाध्यक्ष रिसोड मालेगाव विधानसभा या नियुक्त्या देण्यात आल्या तर दादासाहेब चंद्रभान वाघ सरपंच नेवासा , रमेश शेठ लूनिया अहिल्या नगर यांना शिवसंग्राम मध्ये अधिकृत प्रवेश देण्यात आला.

### सामाजिक सलोख्याचे

आजही आदराने घेतलं जातं. त्याच पावलांवर चालत बाळा बांगर सामाजिक सलोख्याचं कार्य पुढे नेत आहेत. बाळा बांगर यांनी यावेळी युवकांची टीम तयार करून जिल्ह्यात सामाजिक सलोखा प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत राहणार असल्याचंही जाहीर केलं. सध्याच्या काळात वाढती सामाजिक दरी आणि मतभेद लक्षात घेता, ही पावलं निश्चितच बीड जिल्ह्यासाठी मार्गदर्शक ठरणार आहेत. सामाजिक सलोखा म्हणजे केवळ शब्द नव्हे, ती एक कृती असते आणि आम्ही ती कृती दाखवणार आहोत, असं सांगून बाळा बांगर यांनी आपल्या पुढील अभियानाची सुरुवात केली आहे

### सामाजिक सेवेचा यथोचित

अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे इतर समाजसेवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

### साक्षी कांबळेच्या न्यायासाठी

सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व समाज बांधव यांनी संख्येने उपस्थित राहावे. असे आव्हान नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड यांच्या वतीने करण्यात येत आहे.

### केजमध्ये डान्स स्पर्धेचे

दुरुस्त करणे अवघड असते. रस्ता करताना भरावाची दबाई व्यवस्थित न करणे आणि रस्ता झाल्यावर क्युरिंग न केल्यामुळे अशा भेगा पडतात. किंवा तेवढा पॅच निकृष्ट दर्जाचा असल्यासदेखील अशा भेगा पडतात त्यामुळे संमंधीत प्रशासनाने तातडीने कारवाई करुन केज कळंब राज्य महामार्ग लवकरात लवकर दुरुस्त करावा अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत.

### तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये

पी.एस.आय.स्वप्निल कोळी त्यांच्या हस्ते पहिला पाण्याचा घोट तक्रारदार गोरक्षनाथ सुतार यांना पाजला यावेळी उपस्थित पी एस आय घोडके साहेब ए एस आय काकडे साहेब गोपनीय शाखेचे विठ्ठल चव्हाण, पो,शिंदे लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे दादाराव रोकडे ,वाजेद कुरेशी, यांच्या सह अनेक गावकरी उपस्थित होते.

### भुरट्या पुढाऱ्याला पडताहेत

पक्ष केंद्रीय लेवलचा पक्ष आहे व विचार शैलीतील पक्ष आहे त्यामुळे लोकांचे मुंडके मोडुन घशाला कोरड पडली असताना बोंब मारत फिरणाऱ्या भुरट्या पुढाऱ्यांला भाजपचे तालुकाध्यक्ष पदाचे स्वप्न पडत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## कल्याण पूर्व पुना लिंक रस्त्यावर डंपरची डिवायडरला धडक

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोडवर विजय नगर परिसरात डंपरने रस्त्यामधील डिवायडरला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात सुदैवाने जीवित हानी झाली नाही. कल्याण पूर्वेतील पुना लिंक रस्त्यावर विजयनगर परिसरात रस्त्यामधील डिव्हाडरला डंपर चालकाचे नियंत्रण सुटल्याने डंपर डिव्हायडरवर चढला. ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या रस्त्यावर दुपारच्या सुमारास वर्दळ कमी होती. त्यामुळे कोणतेही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही. दरम्यान कल्याण पूर्वेकडे पुन्हा लिंक रोडवर काटेमानवली ते विजयनगर दरम्यान अपघाताच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणाऱ्या अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी यासह या रस्त्यावरील अपघातांवर नियंत्रणासाठी वाहतूक पोलिसांनी व महापालिका प्रशासनाने ठोस पावले उचलावीत अशी मागणी नागरिकांकडून केले जात आहे. या संदर्भात मनसे पदाधिकारी योगेश गव्हाणे यांनी या अपघात घटनेमुळे संदर्भीत रस्त्यावर धावणाऱ्या अवजड वाहनांचा वाहतूक प्रश्नावर प्रशासनाने लक्ष देत योग्य ती कारवाई केली पाहिजे. अन्यथा यासंदर्भात आंदोलन करणार असल्याचा इशारा मनसे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी दिला आहे.

# पालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्याला दुर्गंधीयुक्त पिवळसर रंग

## पाणी उकळून पिण्याचे पालिकेचे आवाहन

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

कल्याण-डोंबिवली पालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्याला काही दिवस पिवळसर रंग आणि ते पाणी दुर्गंधी युक्त असण्याची शक्यता आहे. कल्याण-डोंबिवली पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने हे पाणी पाहून नागरिकांनी घाबरून जाऊ नये. हे पाणी नागरिकांनी उकळून, गाळून प्यावे, असे आवाहन केले आहे.

कल्याण-डोंबिवली शहरांना उल्हास नदीतून पाणीपुरवठा केला जातो. या नदीला पडलेला जलपर्णीचा विळखा काढण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शुक्रवारपासून एक यंत्राच्या साहाय्याने उल्हास नदीत सुरुवात केली आहे. जलपर्णीच्या मुळाशी चिखलाचे लगदे आहेत. यांत्रिक सयंत्राच्या साहाय्याने ही जलपर्णी काढताना पाणी अधिक गढुळ होत आहे. जलपर्णींच्या पानांचा



पाण्यावरील वेढा यंत्राच्या साहाय्याने काढताना पानगळ, काही पानांचा चुरा होत आहे. या नदी प्रदूषण मुक्त करण्याच्या कामासाठीचे काम करताना उल्हास नदीतून कल्याण, डोंबिवली शहरांना पिवळसर रंगाचा दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे.

घरातील नळाला पिवळसर रंगाचे दुर्गंधीयुक्त पाणी आले तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये. हे पाणी उल्हास नदीतील जलपर्णी बाहेर काढताना निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झाले आहे. पालिकेच्या बारावे जलशुद्धीकरण केंद्रात हे पिवळसर दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने या केंद्रातील क्लोरीनची मात्रा प्रमाणात ठेऊन पाणी शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी सांगितले.

> " उल्हास नदीतील जलपर्णी काढण्यासाठी दोन यंत्रांची उपलब्धता झाली आहे. यामधील एक यंत्राने उल्हास नदीतील जलपर्णी काढण्यास सुरुवात झाली आहे. हे काम आठ दिवसांत पूर्ण केले जाईल. दुसरे यंत्र लवकरच सक्रिय होईल.
>
> - **उपेंद्र कुलकर्णी**, उपप्रादेशिक अधिकारी, कल्याण.

नवी मुंबईकरांचा विजयी मार्च काढत आनंदोत्सव

# डीपीएस तलाव फ्लेमिंगोसाठी 'संरक्षित क्षेत्र' म्हणून घोषित

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**



नवी मुंबईतील पामबीच मार्गालगतचा डीपीएस तलाव फ्लेमिंगोसाठी 'संरक्षित क्षेत्र' म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केल्यानंतर रविवारी (दि.२०) नवी मुंबईतील पर्यावरणप्रेमी व नागरीकांनी विजयी मार्च काढत आनंदोत्सव साजरा केला. रविवारी डीपीएस तलाव येथील परिसरात मोठ्या संख्येने नागरीक व पर्यावरणप्रेमी आनंदोत्सवात सहभागी झाले होते.

नवी मुंबईतील नेरूळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलाव संरक्षित करण्यासाठी वारंवार साखळी आंदोलन करत नवी मुंबईकर नागरीक व पर्यावरणप्रेमी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. गतवर्षी तलावात येणारे खाडीचे पाणी रोखल्याने तलावाच्या अस्वच्छतेबाबत पर्यावरणप्रेमींनी सातत्याने आवाज उठवला होता. वनमंत्री गणेश नाईक यांनी गतवर्षी प्रत्यक्ष भेट देत सिडकोने तलावात येणाऱ्या आंतरभरतीच्या पाण्याचा प्रवाह रोखला होता तो सुरू केला होता. त्यामुळे हा तलाव संरक्षित क्षेत्र करण्यासाठी नॅटकनेक्ट तसेच विविध संस्था व विविध पर्यावरणप्रेमी यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न व साखळी आंदोलने करण्यात आली होती. फ्लेमिंगो सिटी संबोधल्या जाणाऱ्या नवी मुंबईतील पामबीच मार्गालगतच्या तलावात खाडीचे पाणी येत असल्याने सातत्याने येथे फ्लेमिंगोंचा वावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनीच डीपीएस तलाव संरक्षित म्हणून घोषित केल्याने रविवारी नागरीकांनी तलावाजवळ एकत्र येत आनंदोत्सव साजरा कर विजयी मार्च काढत आनंदोत्सव साजरा केला.

> " डीपीएस तलाव हा संरक्षित क्षेत्र घोषित झाला यापाठीमागे नवी मुंबई शहरातील सर्व पर्यावरणप्रेमी व नॅटकनेक्ट तसेच इतर संस्था यांचा हा विजय असून एनआरआय व इतरही फ्लेमिंगोचे अधिवास असलेले तलाव वाचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहणार आहोत. एनआरआय संकुलाच्या पाठीमागे फ्लेमिंगोंचा अधिवास असलेला व सिडकोचा गोल्फ कोर्स प्रकल्पही रद्द झाला आहे.
>
> - **बी. एन. कुमार**, संस्थापक, नॅटकनेक्ट फाऊंडेशन

## वेचक

## टिटवाळा येथील रोजगार मेळाव्यात तरुणांची गर्दी



**कल्याण :** कल्याण-डोंबिवली मनपाक्षेत्रातील ग्रामीण 'अ' प्रभाग क्षेत्रातील युवक, युवती, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी प्राप्त होण्यासाठी बल्याणी प्रभागाचे माजी नगरसेवक मयूर पाटील यांच्या वतीने भव्य रोजगार मेळावा नुकताच टिटवाळा येथे संपन्न झाला. शहरातील सर्व सुशिक्षित तरुण तरुणींसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक मयूर पाटील यांच्या पुढाकाराने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. टिटवाळा पूर्व मांडा येथील प्रथमेश मंगल कार्यालयात पार पडलेल्या या रोजगार मेळाव्यात सकाळपासूनच तरुण तरुणींची एकच गर्दी दिसून आली. शेकडो बेरोजगार तरुण-तरुणींना विविध कंपन्यांमध्ये कामाचे अपॉइंटमेंट लेटर मिळाल्याचे मयूर पाटील यांनी सांगितले. या मेळाव्यात फ्लिपकार्ट, मिंत्रा, बीटीएस कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या भव्य रोजगार मेळाव्यात २०० हून अधिक जणांना रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या.

### २०० हून अधिक जणांना मिळणार रोजगार

## ५० टी. बी. रुग्णांना पोषण आहाराचे वाटप



**बदलापूर :** पंतप्रधान मोदी यांनी २०२५ पर्यंत भारताला क्षयरोगमुक्त करण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवले आहे. हाच आदर्श देऊन बदलापूरचे माजी नगरसेवक तथा निक्षय मित्र किरण भोईर आणि डॉ. रचना भोईर यांच्या वतीने ५० टी. बी (क्षयरोग) रुग्णांना एप्रिल महिन्याचे संपूर्ण पोषण आहाराचे वाटप रविवारी (दि. २०) रोजी करण्यात आले. क्षयरोग रुग्णांना औषधासोबतच पूरक पोषण आहार मिळाला, तर हा रुग्ण लवकर बरा होण्यास मदत होते. किरण भोईर आणि डॉ. रचना भोईर यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## गटारे बुजवल्याने पावसाचे पाणी तुंबण्याचा धोका

**भिवंडी :** भिवंडी शहरातील विविध भागांमध्ये गटाऱ्यांवरील झाकणे चोरीला जात आहेत, तर अनेक ठिकाणी गटारे बुजवल्याने पावसाचे पाणी तुंबण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांची सुरक्षाच धोक्यात आल्याची तक्रार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महापालिकेकडे केली आहे. भिवंडी शहरातील कासार आळी, ब्राह्मण आळी परिसरातील रस्त्यालगत असलेली गटारे अस्तित्वात नसल्याचे दिसत आहे. या भागात रस्त्यालगत असलेल्या भुयारी गटारे पाच-सहा वर्षांपासून बुजवण्यात आली आहेत, तर या परिसरात दोन शाळा व कनिष्ठ महाविद्यालये लगतची गटारे गेली सहा ते सात वर्षांत एकदाही साफ करण्यात आली नाही. त्यामुळे गटारातील साचलेल्या पाण्याची दुर्गंधी, अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे भिवंडी शहर विभाग अध्यक्ष कुणाल आहिरे यांनी शहर अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. शहरातील अनेक भागात गटारावरील लोखंडी झाकण चोरीला गेली असल्याने गटारांमध्ये पडून अनेक अपघात होत आहेत. परंतु आता तर गटारांची स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांचे अस्तित्व नष्ट झाल्याचे दिसत आहे.

## जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने शरद पुस्तके यांचे व्याख्यान

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने, मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी ठाणे महापालिकेच्या 'विचारमंथन व्याख्यानमाले'त 'अक्षय उर्जा संवर्धन' या विषयावर संशोधक शरद पुस्तके यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान स. ११.०० वाजता ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे होणार आहे. ते सगळ्यांसाठी खुले आहे. व्याख्यानमालेतील हे पंधरावे पुष्प आहे. राज्यभरात, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिन आणि ०१ मे हा महाराष्ट्र दिन यांचे औचित्य साधून या काळात वसुंधरा संवर्धनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. 'आमचा ग्रह, आमची पृथ्वी' ही यंदाच्या वर्षीची संकल्पना आहे. त्या अनुषंगाने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अक्षय ऊर्जा संवर्धन विषयातील तज्ज्ञ असलेले शरद पुस्तके हे फाऊंडेशन फॉर इंटर डिसिप्लिनरी रिसर्च संस्थेचे संस्थापक विश्वस्त आणि अध्यक्ष आहेत. स्वच्छ व्यवस्थापन विकास प्रकल्पाचे ते सल्लागार आहेत.

## मीरा-भाईंदर पालिकेचे श्वान निर्बीजीकरण केंद्र बंद



◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महापालिकेचे श्वान निर्बीजीकरण केंद्र मागील काही दिवसापासून बंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे निर्बीजीकरण करण्याची प्रक्रिया ठप्प झाली असल्याने शहरात भटक्या श्वानांचा उपद्रव वाढण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे. मीरा-भाईंदर शहरातील भटक्या श्वानासाठी पालिका प्रशासनाने उत्तन येथे लसीकरण प्रकल्प आणि श्वान निर्बीजीकरण केंद्र उभारले आहे. या केंद्रात दररोज सुमारे तीसहून अधिक श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केली जाते. शस्त्रक्रिया केल्यानंतर हे श्वान पाच ते सात दिवस केंद्रातच ठेवले जातात व त्यानंतर ते पुन्हा त्यांच्या जागी सोडले जातात. मात्र श्वानाची वाढती संख्या पाहता हे केंद्र आता अपुरे पडू लागले आहे. त्यामुळे ही अडचण दूर करण्यासाठी उत्तन येथे नवे निर्बीजीकरण केंद्र उभारण्याचा निर्णय पालिकेमार्फत घेण्यात आला असून त्यासाठी जागेचा शोध सुरु आहे. शहरात श्वानाची संख्या झपाट्याने वाढत असतानाच मागील काही दिवसापासून पालिकेचे श्वान निर्बीजीकरण केंद्र बंद असल्याचे समोर आले आहे. प्रामुख्याने हे केंद्र ठेकेदाराच्या मदतीने चालवले जाते. यात प्रशासन आणि ठेकेदार यांच्यात वाद सुरु असल्यामुळे हे केंद्र बंद ठेवण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तर पुढील काही दिवस हे केंद्र असेच बंद राहिल्यास शहरात भटक्या श्वानाची समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## पोलिसांकरिता सायबर सिक्युरिटी प्रशिक्षणामध्ये २५३ अधिकाऱ्यांचा सहभाग

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**



मुंबई पोलिसांनी सायबर गुन्ह्याचा आपला प्रतिसाद मजबूत करण्यासाठी आपल्या २५३ अधिकाऱ्यांसाठी एक तीनदिवसीय सायबर अन्वेषण आणि फॉरेन्सिक प्रशिक्षण आयोजित केले होते. या कार्यक्रमाला जगातील सर्वात मोठी एक्स्प्रेस वाहतूक कंपनी फेडरल एक्स्प्रेस कॉर्पोरेशन (फेडएक्स) आणि युनाइटेड वे मुंबईचे समर्थन आहे. ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, आर्थिक सायबर धमक्या आणि सोशल मीडियाचा गैरवापर यांसारखे डिजिटल गुन्हे हाताळण्यासाठी सायबर सेल्स, क्राइम ब्रांच, डिटेक्शन युनिट्स आणि अँटी-नार्कोटिक्स सेल्समधील अधिकाऱ्यांच्या क्षमता वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

मुंबईचे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे म्हणाले, "सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत चालले आहे आणि त्यातील अत्याधुनिकता देखील वाढली आहे, त्यामुळे आपल्या अधिकाऱ्यांनी क्षमतेत त्यांच्या पुढे असणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल धमक्यांचा तपास आणि त्यावरील प्रतिक्रिया अधिक कार्यक्षमतेने देण्यासाठी आपल्या दलाला तयार करण्यात या प्रशिक्षणाची मोठी भूमिका आहे. त्याच बरोबर लोकांमधील जागरूकता देखील तितकीच महत्त्वाची आहे आणि लोकांना सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल पद्धतींबाबत शिक्षित करण्यासाठी जे प्रयत्न केले जात आहेत, ते कौतुकास्पद आहेत."

हा प्रशिक्षण कार्यक्रम सायबर सिक्युरिटी जागरूकता पसरवण्यासाठी आणि संस्थांच्या क्षमता वाढवण्यासाठी, फेडएक्सच्या समर्थनाने युनाइटेड वे मुंबईने चालवलेल्या मोठ्या प्रयत्नांचा एक भाग आहे. आत्तापर्यंत युनाइटेड वे मुंबई, नवी मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळूरु येथील १०,००० पेक्षा जास्त लोकांपर्यंत पोहोचली आहे. फक्त मुंबईतच ५,१९७ महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांना सायबर स्वच्छता आणि डिजिटल सुरक्षा पद्धतींविषयी माहिती देण्यात आली आहे. या उपक्रमाने नवी मुंबई पोलिसांतील देखील ५०० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांना सायबर गुन्हा अन्वेषणात प्रशिक्षित केले आहे.

## स्वीमिंग पूलमध्ये बुडून चिमुकल्याचा मृत्यू

◆ **ठाणे (वार्ताहर):**

भाईंदर पूर्व येथील गोल्डनेस्ट परिसरातील मनपा संचलित स्व. गोपीनाथ मुंडे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या स्वीमिंग पूलमध्ये ११ वर्षीय ग्रंथ हसमुख मुथा या चिमुकल्याचा बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी सकाळी घडली. मिळालेल्या माहितीनुसार, ग्रंथ मुथा हा नेहमीप्रमाणे सकाळी पोहण्यासाठी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये गेला होता. काही वेळातच तो पाण्यात गायब झाला; परंतु त्या वेळी पूल परिसरात उपस्थित प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी वेळेवर लक्ष न दिल्याने कुणालाच त्याच्या नसल्याची जाणीव झाली नाही. काही वेळाने तो पाण्यात बेशुद्ध अवस्थेत सापडला. तातडीने त्याला भाईंदरमधील तुंगा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेची बातमी समजताच मुथा कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. ग्रंथच्या वडिलांनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणालाच या घटनेचे कारण ठरवत कठोर कारवाईची मागणी केली आहे. भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांनीही तत्काळ तुंगा हॉस्पिटलमध्ये जाऊन पीडित कुटुंबाची भेट घेतली.

# भूसंपादनात चुकीच्या पद्धतीने झालेली नोंद रद्द

◆ **बदलापूर (वार्ताहर):**



मध्य रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेच्या कामासाठी होत असलेल्या भूसंपादनात चुकीच्या पद्धतीने झालेली नोंद रद्द करून सातबारा निर्णय सोसायटीच्या सदस्यांच्या बाजूने लागल्याने दिसतीसोसायटीने रविवारी (दि. २०)रोजी फटाके तसेच एकमेकांना पेढे भरवून जल्लोष साजरा केला. तसेच यासाठी विशेष प्रयत्न करणारे वकील ॲड. प्रदीप पाटील तसेच आमदार किसन कथोरे व स्थानिक माजी नगरसेवक नरहरी पाटील, आदित्य पाटील यांचे आभार ही मानले. बदलापूर पूर्वेकडील स्वानंद अर्णव सोसायटीच्या बाजूने लढणारे वकील ॲड. प्रदीप पाटील तसेच लक्षवेधीद्वारे विधानसभा अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करणारे आमदार किसन कथोरे व या संपूर्ण लढ्यात सोसायटी रहिवाश्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेले स्थानिक माजी नगरसेवक नरहरी पाटील व आदित्य पाटील यांचा सत्कार करून रहिवाशांनी आभार मानले.

रेल्वेच्या तिसऱ्या चौथ्या मार्गिकेसाठी भूसंपादन करताना बदलापूर पुर्वेकडील स्वानंद अर्णव सोसायटीच्या सातबारावर चुकीच्या पद्धतीने भूसंपादनाची नोंद करण्यात आली होती. स्वानंद अर्णव को. ऑप हौ. सोसायटीच्या मानीव अभिहस्तांतरण करण्याचे काम सुरू केल्यानंतर ॲड. प्रदीप पाटील यांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटीतील रहिवाशांनी भूसंपादन कार्यालय तथा उपविभागीय कार्यालयात तक्रार अर्ज दाखल केले होते. दुसरीकडे माजी नगरसेवक नरहरी पाटील व आदित्य पाटील यांनी रहिवाशांसह स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्याकडे धाव घेत याप्रकरणी न्याय मिळावा यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली होती. सोसायटीच्या सातबारावर १३३० चौ.मी. या क्षेत्रावर चुकीच्या पद्धतीने झालेली 'मुंबई रेल्वे विकास कॉपारेशन लि.' यांच्या नावाची नोंद कमी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ही नोंद रद्द झाली असून सोसायटीचा सातबारा कोरा झाला असल्याची माहिती ॲड. प्रदीप पाटील यांनी दिली.

## तहानलेल्या हरीणाची पाण्यासाठी कोरड्या विहिरीत उडी

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**



मुरबाड तालुक्यातील डोईफोडी नदीलगत असलेल्या कासगाव हद्दीतील एका कोरड्याठाक विहिरीत तहानलेल्या साडेतीन वर्षांच्या हरीणीने उडी मारली परंतु विहीरीत पाण्याचा थेंबही नसल्याने त्या तहानेने व्याकूळ झालेल्या हरीणीने बाहेर पडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, मात्र विहिरीच्या बाहेर येण्यासाठी हरणाला गंभीर दुखापत झाली. याबाबत तरुणांनी मोबाईलद्वारे सरळगाव येथील वनरक्षक दिगंबर शिंगोळे, वनपाल भांगरे, वनरक्षक लखन रहाटे, भानुदास देसले, अर्जुन फोडले, अश्वमेध प्रतिष्ठान, तसेच वन्यजीव रेस्कुटीमचे साईनाथ भवार, प्रवीण भालेराव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन अथक परिश्रमाने हरीणीला विहिरी बाहेर काढले असता हरीण गतप्राण झाले. या दुर्दैवी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वनविभागाने या मुक्या प्राण्यांसाठी कृत्रिम पाणवठे तयार करून वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे अशी मागणी वन्य प्राणी प्रेमींकडून होत आहे.

बाजारपेठेत दरामध्ये प्रतिकिलो १५० ते २०० रुपयांची घसरण

# यंदा लाल मिरचीचा उतरला 'ठसका'; स्वस्ताहीने वाढला गोडवा

◆ **मुरबाड (वार्ताहर):**



राज्यातील ग्रामीण व शहरी भागात तसेच आदिवासी पट्ट्यात सर्वसामान्यांच्या घरांमध्ये रोजच्या जेवणात लाल मिरच्या आढळून येतात. यंदा मिरचीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. जेवणामध्ये कुठलाही तिखट पदार्थ बनवायचा असेल, तर लाल मिरची गरजेची असते. मिरची शिवाय तिखट पदार्थ बनवणे अशक्य आहे. त्यामुळे यंदा मागील वर्षापेक्षा लाल मिरचीचा बाजार भाव उतरल्याने लाल मिरची खरेदीसाठी सर्वच बाजारपेठेत गृहिणींची झुंबड पाहायला मिळत आहे. ग्रामीण भागात लाल मिरचीला सतत दोन दिवस उन्हात सुकवून मसाला चक्कीवर दळण्यासाठी ग्राहकांनी पसंती दिली आहे. तसेच बाजारामधल्या विक्रीच्या मसाल्यापेक्षा घरगुती मसाल्याला गृहिणींची पसंती असल्याचे कोरावळे येथील गृहिणीं तथा जय भवानी महिला बचत गट अध्यक्षा भाग्यश्री भालेराव यांनी दिली आहे.

यंदा मिरचीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. गृहिणी मिरची विकत घेताना तालुक्यातील प्रमुख सरळगाव, धसई, टोकावडे, म्हसा, मुरबाडमध्ये गृहिणींची गर्दी पाहायला मिळत आहे. तसेच बाजारात लाल मिरची विकत घेताना लाल मिरची प्रति किलो मागे १५०/२०० रुपयांचा बाजार भाव उतरल्याचे पाहायला मिळते.

**लाल मिरचीचे बाजार भाव पुढीलप्रमाणे**

| मिरचीच्या वेगवेगळ्या जाती | सन २०२५ चे बाजार भाव |
|---|---|
| पत्री मिरची | १४०/१३० किलो |
| लवंगी मिरची | १६०/१५० किलो |
| बेडकी मिरची | १९०/१८० किलो |
| शंकेश्वरी मिरची | १६०/१७० किलो |
| काश्मिरी मिरची | ३०० किलो |
| ढोबळी मिरची | ३२० किलो |

## प्लास्टिक प्रदूषणात उल्हास नदी तिसऱ्या स्थानावर

◆ **कल्याण (वार्ताहर) :**



समुद्रात प्लास्टिकचे प्रदूषण करण्यात तिसऱ्या स्थानावर उल्हास नदीचे नाव घेतले जाते. तसेच या नदीत सूक्ष्म प्लास्टिकचे प्रमाण जास्त असल्याचेही दिसून आले आहे. याबाबतचे दोन अहवाल जागतिक पातळीवर प्रसिद्ध झाल्याची माहिती अश्वमेध प्रतिष्ठानचे अविनाश हरड यांनी दिली आहे.

उल्हास नदीच्या प्रदूषणावरून जागतिक स्थरावर दोन अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. यातील पहिला अहवाल २०२१ मध्ये 'अवर वर्ल्ड इन डेटा' या ऑक्सफर्ड विद्यापीठातर्फे संचलित केल्या गेलेल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यावेळी लॉरेन्स मेईजर संशोधकाने समुद्रात प्लास्टिकचे सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या हजार नद्यांचा अभ्यास केला होता. या नद्या समुद्रात होणाऱ्या प्लास्टिक प्रदूषणाचा ८० टक्के वाटा उचलतात, असे अहवालात नमूद करण्यात आला आहे. या अहवालात समुद्रात प्लास्टिकचे प्रदूषण करणाऱ्या नद्यांच्या यादीमध्ये उल्हास नदी तिसऱ्या स्थानावर असल्याचे नमूद करण्यात आले आहे, तर दुसरा जागतिक अहवाल हा २०२२ मध्ये 'इंटरनॅशनल नॉलेज हब अगेंस्ट प्लास्टिक पोल्युशन' या नावाजलेल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला आहे. चांदनी वर्मा, मनोज पिसे, प्रदीप कुमार, सचिन गोसावी, लुकास कालोस या संशोधकांनी एकत्र काम करून हा अहवाल तयार केल्याचे नमूद आहे. देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या प्रांतातून वाहणाऱ्या उल्हास नदीत सर्वाधिक सूक्ष्म प्लास्टिक असल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच उल्हास नदीच्या खोऱ्यातील विविध ठिकाणांहून गोळा केलेल्या गाळाच्या नमुन्यांमधील प्लास्टिकचे एफटीआयआर-एटीआर, रमन स्पेक्ट्रोस्कोपी आणि सेम-एडीएक्स अशा वैज्ञानिक प्रयोग पद्धतीच्या सहाय्याने करण्यात आलेले निष्कर्ष चिंताजनक होते. उल्हास नदीच्या नऊ उपखोऱ्यांपैकी पाच उपखोऱ्यांमध्ये पर्यावरणीय दृष्टीने मोठा धोका संभवतो, असे अहवालात नमूद आहे.

# टेस्ला: रोजगार निर्मितीला चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टेस्लाचे मालक इलान मस्क यांच्यात काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. या चर्चेचा सारांश भारतात टेस्लाचा प्रवेश निश्चित करण्याचा होता आणि त्या दृष्टीने दोन्ही प्रमुखांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला टॅरिफच्या धमकीने दहशतीत ठेवले असताना भारतीय पंतप्रधान अमेरिकन उद्योगपती मस्क यांच्याशी त्यांचा टेस्ला हा उद्योग भारतात विस्तारित करण्यासंदर्भात चर्चा करतो ही निश्चितच आशादायक बाब आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील उद्योगांमध्ये व्यापक चर्चा होऊ शकते आणि या दोन्ही बाबतीत प्रचंड वाव आहे, हे मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेतून स्पष्ट झाले आहे. जरी भारताचे अमेरिकेशी टॅरिफच्या मुद्यावरून संबंध बिघडलेले असले तरीही मोदी यांच्या म्हणण्यानुसार भारत अमेरिकेशी असलेली आपली भागीदारी पुढे नेऊ इच्छितो आणि मोदी यांनी हे स्पष्ट सांगितले आहे. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेला या अर्थाने महत्त्व आहे कारण मस्क हेच सध्याच्या ट्रम्प प्रशासनात प्रभावशाली व्यक्ती म्हणून समजले जातात. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करणे हे भारतासाठी प्रचंड लाभदायक ठरू शकते. टेस्लाचे भारतातील आगमन यामुळे निश्चित झाले आहे असे समजले जाते. भारतातील अन्य विरोधी पक्षांनी टेस्लाच्या आगमनासाठी काही वर्षांपूर्वी पायघड्या घातल्या होत्या.

पण मस्क यांनी मोदी यांना पसंती दिली यावरून मोदी यांचे अमेरिकेशी आणि ट्रम्प यांच्याशी किती जिव्हाळ्याचे संबंध आहेत ते लक्षात येते. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेत अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली असे सांगण्यात आले. पंतप्रधान मोदी यांच्या स्वायत्ता धोरणाला प्रचंड महत्त्व आहे आणि भारताने कोणत्याही बाबतीत अमेरिकेच्या किंवा कोणत्याही देशाच्या दबावाखाली येऊन निर्णय घेतला नाही हे वास्तव आहे. भारताचे कोणत्याही देशाच्या दबावाखाली न येण्याचे धोरण लक्षात घेऊन मोदी वारंवार अनेक देशांचे दौरे करत असतात, पण काल मात्र त्यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली. इलान मस्क यांना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून गणले जाते. मोदी आणि मस्क यांच्यात तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण संशोधन यावर चर्चा झाली. ही चर्चा फलद्रूप झाली तर त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी आत्यंतिक होणार आहेत. भारताची अर्थव्यवस्था सध्या चांगल्या अवस्थेत असली तरीही तिच्यावर टॅरिफचे सावट आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी मस्क यांचा आधार भारताने शोधला तर त्यात वावगे काही नाही. टेस्लाच्या आगमनाने भारतीय बाजारपेठ उत्साहाने उचबंळून येणार आहे आणि भारतीय बाजारात नव्या गाड्यांचे आगमन होणार आहे आणि त्यामुळे सध्या जी बाजाराला विशेषतः विद्युत वाहनांच्या बाजारपेठेला मरगळ आली आहे ती जाणार आहे. त्यादृष्टीने मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेचे महत्त्व अपरंपार आहे. टेस्ला कार्स ज्या विद्युतवर चालतात त्यांच्या आगमनाची भारतात प्रचंड प्रतीक्षा आहे. त्यामुळे ही चर्चा जर खरोखरच यशस्वी झाली, तर भारतीय कार उद्योगासाठी ती क्रांती ठरेल. शिवाय मरगळलेल्या कार उद्योगासाठी टेस्लाचे आगमन ही सुखद वार्ता ठरेल, त्यादृष्टीने या चर्चेकडे सकारात्मक पद्धतीने पाहिले पाहिजे. पण त्यापेक्षा या चर्चेकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे ते सध्याच्या अमेरिकेच्या टॅरिफच्या धोरणाच्या संदर्भात.

मोदी आणि मस्क यांच्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील संभाव्य सहकार्याबाबत चर्चा झाली ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या चर्चेनंतर टेस्लाचे भारतातील आगमन निश्चित मानले जात आहे. त्यामुळे भारतातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होणार आहे आणि अमेरिकेच्या जगभरात जो संताप व्यक्त होत आहे त्याला कुठेतरी आळा बसेल अशी दोन्ही देशांना आशा आहे. तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रात चर्चा झाली आणि त्यावर व्यापक सहमती होण्याची शक्यता आहे. मोदी यांच्यासारखा द्रष्टा पंतप्रधान लाभल्यामुळे देशाला कितीही मोठ्या संकटातून वाट काढून घेऊन जातो याचे हे उदाहरण आहे. या चर्चेचे फलित म्हणून या महिन्यात टेस्लाचे अधिकारी भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यात टेस्लाच्या आगामी आगमनासंबंधी तपशील निश्चित होईल. ही चर्चा त्यासाठीच होती असे सांगण्यात आले आहे. टेस्लाने भारतात तर भरती प्रक्रिया सुरू केली आहे अशीही चर्चा आहे. त्यामुळे विरोधक कितीही बोंबा मारोत किंवा भारताच्या सार्वभौमत्वासंदर्भात कितीही ओरड करोत, टेस्ला भारतात येणार आणि भारताला चांगले दिवस येणार हे निश्चित आहे, आता टेस्लाचे आगमन, तर निश्चित आहे. त्यामुळे भारतात आनंदाची लहर पसरणार आहे. कारण भारतातील विद्युत वाहनांची बाजारपेठ यामुळे प्रचंड उत्साहित झाली आहे. तसेच विद्युत वाहनांची खरेदी वाढणार आहे आणि त्यामुळे प्रदूषणाला आळा बसणार आहे.

मोदी आणि मस्क यांच्यातील या चर्चेकडे या सर्व प्रकारच्या सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. मोदी आणि मस्क यांच्यात चर्चा झाली ती तंत्रज्ञान आणि सहकार्यावर झाली. या दोन्ही क्षेत्रात प्रचंड सहकार्याची बीजे आहेत हे दोघांनीही ओळखले. टॅरिफच्या सावटात भारत आणि अमेरिका यांनी एक होणे गरजेचे आहे हे भारताने ओळखले आहे तितकेच ते अमेरिकेने ओळखले आहे. कारण जितकी भारताला अमेरिकेची गरज आहे तितकीच अमेरिकेलाही भारताची गरज आहे आणि मस्क यांच्याबाबतीत तर असे सांगता येईल की, त्यांच्या कंपनीसाठी भारतासारखी विशाल बाजारपेठ दुसरी नाही. चीनची आता पूर्वीसारखी स्थिती नाही आणि त्यामुळे चीनच्या कार्स मग त्या कोणत्याही असोत विद्युत वाहने असोत की साध्या कार्स, आज त्यांना अमेरिकेची बाजारपेठ नाही. त्यामुळे टेस्ला यांना भारताची गरज आहे आणि भारतालाही टेस्लाही गरज आहे. त्यामुळे या चर्चेकडे दोघानींही सकारात्मक दृष्टीने पाहिले आणि त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी चांगलेच होणार आहेत. या चर्चेचे स्वागत करायला हवे.

# नितीन गडकरींच्या एकलव्य एकल शाळांची ज्ञानगंगा गावोगावी...!






सत्ताकारणाला समाजकारणाची जोड दिली तर एखादा राजकीय नेता त्याच्या आयुष्यात काय चमत्कार घडवून आणू शकतो याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे भाजपाचे नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सुरू केलेल्या एकलव्य एकल शाळांचे भले मोठे जाळे हे आहे. कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या माध्यमातून विदर्भातील सात जिल्ह्यात जवळपास ११०० एकलव्य एकल शाळा उभ्या राहिल्या आहेत आणि त्या अखंडपणे सुरू आहेत. या एकलव्य एकशिक्षकी शाळांच्या माध्यमातून सुमारे ३०,००० शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे विलक्षण काम गेल्या २९ वर्षांपासून कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या माध्यमातून अव्यहातपणे सुरू आहे. सरकारी मदतीची एक दमडीही न घेता लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था ही सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून आणि त्यातही उल्लेखनीय म्हणजे भाजपा नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या भरभक्कम पाठिंब्याच्या बळावर आगामी काळात संपूर्ण महाराष्ट्रभर एकलव्य एकल शाळा सुरू करणार आहे. एका सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात शाळाबाह्य मुलांची संख्या ही सुमारे नऊ लाखांच्या घरात आहे. आगामी काळात यातील किमान एक लाख शाळाबाह्य विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट कैलासवासी लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेने आखले आहे.

**जाणवाया दुर्बलांचे दुखः आणि वेदना...!**
**तेवत्या राहो सदा, रंध्रातूनी संवेदना... !**

या गीताच्या ओळी आपल्या कामाचा आधार मानून काम करणारी संस्था म्हणजे नागपूरची कै. लक्ष्मणराव मानकर स्मृति संस्था.

भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे... इतकंच नाही तर शिक्षण हा समाजाचा आत्मा आहे, असंही बाबासाहेब आवर्जून सांगत. असाच शिक्षणाचा वसा गेली २९ वर्षे ही संस्था अत्यंत भक्कमपणे हा वसा जपत आहे. गेल्या २९ वर्षांत मानकर स्मृती संस्थेच्या माध्यमातून कामाचा वटवृक्ष उभा राहीला आहे.

कै. लक्ष्मणराव मानकर हे गोंदिया या दुर्गम जिल्ह्यातील आमगाव या छोट्याशा गावचे. मानकर गुरुजींना परिस्थितीमुळे आपलं शिक्षण पूर्ण करता आलं नाही. पण यामुळे खचून न जाता लक्ष्मणराव मानकर यांनी देशसेवेचे व्रत हाती घेतले आणि जोपासले. आपल्याला शिक्षणाच्या अभावामुळे अनेक गोष्टी करता आल्या नाहीत याची खंत मानकर गुरुजी कायम बोलून दाखवत. लक्ष्मणराव मानकर गुरुजी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक देखील होते तसेच ते विदर्भातून लोकसभेवर खासदार म्हणून निवडून देखील गेले होते. ते काही काळ महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार देखील होते. ज्या नितीन गडकरींच्या नेतृत्वाची भुरळ तरुणांपासून आभार वृद्धांपर्यंत सर्व थरातील जनतेमध्ये आहे त्या नितीन गडकरी यांना राजकारणात आणले ते स्वर्गीय लक्ष्मणराव मानकर गुरुजींनी. यामुळेच गुरुजींच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेची पूर्तता करण्याचा चंग त्यांच्या कार्यकर्त्यांनी बांधला आणि एका वटवृक्षाचं बीजरोपण झालं.

२९ वर्षांपूर्वी या संस्थेच्या माध्यमातून विदर्भातील काही कार्यकर्त्यांनी चार विद्यार्थ्यांसह शिक्षण विषयात कामाला सुरुवात केली. जंगल, खेड्यात वस्ती करून राहणाऱ्या बांधवाना बदलत्या सामाजिक आणि आर्थिक अडचणींमुळे अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक मूलभूत आणि पायाभूत सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात सुद्धा अनेकदा अडचणी निर्माण होतात. मागास, दुर्गम भागात राहणाऱ्या आणि आदिवासी समाजातील वर्तमान आणि भविष्यातील पिढ्या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहतात की काय? अशी भीती निर्माण होऊ लागली. यामुळे अशा सगळ्यांसाठी शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन काम करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला. या सगळ्या कार्यकर्त्यांना मोलाची आणि भक्कम साथ मिळाली ती भाजपाचे नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची.

मोठ्या शाळा उभ्या करणं, त्यासाठी लागणारी इमारत, शिक्षक आणि या सगळ्यासाठी मोठ्या प्रमाणात पैशांची गरज होती. इच्छा शक्ती प्रचंड होती पण पैसा नव्हता. पण काम करणाऱ्या व्यक्तींना समाज उपयोगी काम करण्यापासून पैसा कधीच अडथळा ठरत नाही. कारण परमेश्वराचा आशिर्वाद अशा कामांच्या पाठीशी असतो. मोठ्या निधीच्या अभावी एक वेगळी कल्पना पुढे आली ती एकलव्य एकल विद्यालयाची. या एकलव्य एकल विद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण, आदिवासी आणि शिक्षणाच्या दृष्टीने मागास अशा भागात एक शिक्षकी शाळांच्या माध्यमातून कामाला सुरुवात झाली. या शिक्षणाच्या गंगेचा प्रवास एकलव्य एकल विद्यालय या मार्गाने सुरु झाला. अशा एक शिक्षकी शाळा सुरू करतांना काही उत्साही कार्यकर्त्यांनी फक्त २५ हजार रुपये गोळा केले आणि अनेक दिवसांच्या मेहनतीतून चार विद्यार्थ्यांची पहिली एक शिक्षकी शाळा सुरू झाली.. एक शाळा... एक गाव.... अनेक विद्यार्थी आणि जास्तीत जास्त शिक्षण अशा पद्धतीने काम सुरू झालं..

पहिल्या वर्षी साधारण ८ ते १० एकलव्य एकल शाळांपासून हे काम सुरू झाले. आज तिशीच्या उंबरठ्यावर असतांना साधारण अकराशे (११००) शिक्षकांच्या माध्यमातून ३० हजार विद्यार्थी या एक शिक्षकी शाळांच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत. या सगळ्या शाळा विदर्भाच्या गडचिरोली या नक्षलप्रभावी जिल्ह्यासह चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये या शाळा सुरू आहेत.

गेल्या २८ वर्षांचा विचार केला, तर जवळपास एक पिढी या एकलव्य एकल विद्यालयाच्या माध्यामातून शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्याचं महत्वाचं काम कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

आपण एकलव्य एकल विद्यालयाच्या माध्यमातून सुरू असलेल्या या ज्ञानयज्ञाची या वर्षीची आकडेवारी संस्थेच्या कामाची व्यापकता आणि सर्वसमावेशकता लक्षात आणून देणारी आहे. गडचिरोलीमध्ये कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या माध्यमातून ३४० एकल शाळा सुरू आहेत. या शाळांमध्ये १०,१२० विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात ४० शाळांच्या माध्यमातून १२९० विद्यार्थी, भंडारा जिल्ह्यात ३० शाळांमध्ये मिळून, तर गोंदीया जिल्ह्यात १६० शाळांच्या माध्यमातून ५५८८ विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावण्याचा उपक्रम सुरू आहे. अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट सह १८० दुर्गम भागात शाळांच्या माध्यमातून ६०६८, तर अकोल्यात ५३ आणि बुलढाण्यात ५२ शाळांमधून अनुक्रमे १३५० आणि १२९६ विद्यार्थी एकल विद्यालयात येऊन शिक्षणाचा लाभ घेत आहेत. यवतमाळ सारख्या जिल्ह्यात सुद्धा १८० एकलव्य एकल शाळांच्या माध्यमातून ३६४० विद्यार्थी सहभागी होतात. म्हणजे ८ जिल्ह्यांमध्ये मिळून २४-२५ या वर्षासाठी १०३५ (एक हजार पस्तीस ) शाळा आणि तेवढ्याच म्हणजे १०३५ शिक्षकांच्या माध्यमातून ३०३८२ विद्यार्थी शिक्षणाच्या ज्ञानगंगेत सहभागी होत आहेत.

या सगळ्या एकलव्य एकशिक्षकी शाळा उत्तम पद्धतीने चालाव्यात यासाठी कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे १३४ कार्यकर्ते या सगळ्या ८ जिल्ह्यांमध्ये सतत प्रवास करतात. शाळा नीट चालाव्यात, विद्यार्थी-शिक्षकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी कर्तव्यदक्ष असतात. एकलव्य एक शिक्षकी शाळेत येणाऱ्या मुलांकडे अभ्यासाबरोबरच त्यांचा आहार, खेळ, सामाजिक जाणीवा अशा सगळ्याकडे लक्ष दिलं जातं. म्हणजेच मुलांच्या सर्वांगिण उन्नतीचा वसा कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे उचलला आहे. शाळेत येणाऱ्या सगळ्या मुलांचा त्यांच्या पालकांबरोबर पण मेळावा दरवर्षी आयोजित केला जातो. यावर्षी आठ जिल्ह्यात असे ८५ बालक-पालक मेळावे झाले. यामुळे मुलांच्या शिक्षणाबद्दल पालकांच्या मनातल्या प्रश्नांना सुद्धा उत्तरं दिली जातात, मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग वाढवण्याचा हा स्तुत्य उपक्रम आहे. दुर्गम आणि अतिदुर्गम भागातल्या गावांमध्ये सरकारच्या योजना पोहोचाव्यात, त्याची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सुद्धा कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था सर्व समाजबांधवांना बरोबर घेऊन कायमच सक्रीय असते. अनेक गावं अशी आहेत जिथल्या आरोग्य सर्वेक्षणापासून पाणी योजनेच्या अंमलबजावणीच्या शासकीय कामात सुद्धा संस्थेच्या कार्यकर्त्यांचा, शिक्षकांचा सहभाग राहीला आहे. या उपक्रमात सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. वर्गातील शिक्षण ते लोकशिक्षण अशा सगळ्या विषयात पारंगत असलेला शिक्षक असेल, तर सामाजिक अभिसरणाची ही चळवळ यशस्वी होण्यासाठी जास्त मदत होईल. म्हणूनच मानकर स्मृती संस्थेतर्फे अशा सगळ्या शिक्षक आणि कार्यकर्त्यांना योग्य प्रशिक्षण सुद्धा दिलं जातं. उत्तम विद्यार्थी घडवण्यासाठी शिक्षक सुद्धा उत्तम हवेत. मुलांना शिकवणारे शिक्षक सुद्धा खास प्रशिक्षण घेतलेले असतील याची विशेष काळजी घेण्यात येते. या सगळ्या शिक्षकांच्या वार्षिक आणि निरंतर प्रशिक्षणाची जबाबदारी सुद्धा मानकर स्मृती संस्थेच्या माध्यमातून उचलण्यात आली आहे. ग्राम स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंवर्धन, महिला बचत गट, शेतकरी बचत गट या माध्यमातून समग्र ग्राम विकासाचं ध्येय संस्थेने अंगिकारलं आहे. एकलव्य एकल विद्यालयाच्या दुसऱ्या टप्प्यात अपघात वीमा संरक्षण, उज्ज्वला गॅस योजना, आणि अटल पेंन्शन योजना या सरकारी योजनांचा लाभ एकल विद्यालयाच्याच मुलांना आणि पालकांना नाही, तर सगळ्या गावकऱ्यांना मिळावा यासाठी संस्थेच्या माध्यमातून नियोजनबद्ध काम सुरू आहे. दुर्गम आणि मागास भागातील मुलांना एकलव्य एकल विद्यालयाच्या माध्यमातून शालेय शिक्षण देऊन संस्था थांबली नाही, तर निवडक मुलांना शिक्षणाची अधिक उत्तम संधी मिळावी यासाठी संस्थेने ६५ मुलं आणि ६० मुली यांना नागपूरमध्ये आणलं. या सगळ्या विद्यार्थ्यांची ५ वी ते १२ ची शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. हिंदू मुलींची शाळा, तर मुलं टिळक विद्यालयात शिकतात. तर ११५ विद्यार्थ्यांची अमरावतीमधल्या अंजनगाव सुर्जी इथे शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचं माणूस घडवण्याचं काम इथं संपत नाही. कारण हे नुसतं काम नाही तर तो ध्यास आहे, मानकर गुरुजींकडून घेतलेला वसा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि संचालक मंडळाने कोणत्याही प्रकारची सरकारची मदत न घेता हे माणूस निर्माणाचं शिवधनुष्य उचललं आहे. संस्थेने मुलांना शिक्षणाच्या नंतर हाताला काम देण्यासाठी खास अभियान सुरू केलं आहे. ते म्हणजे कौशल्य विकासाचं जेणेकरून शिक्षणानंतर या मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. पुण्यातील ज्ञानदा गुरूकुल यांच्या सहकार्याने वर्धा जिल्ह्यात अंजनगाव सुर्जी इथे गेल्या दोन वर्षांपासून खूप मेहनतीने कौशल्य विकासाचा उपक्रम राबवला आहे. आत्तापर्यंत या प्रकल्पातून ११० तरुणांचं प्रशिक्षण पूर्ण झालं आहे, तर ५६ मुलांना पुण्यात नोकरी सुद्धा मिळाली आहे. संस्थेने गेल्या जवळ जवळ तीन दशकात माणूस आणि पर्यायाने समाज घडवण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. विदर्भाच्या आठ जिल्ह्यातून सुरू झालेल्या या कामाला आता राज्याच्या सर्व जिल्ह्यात कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचं काम नेण्याचा नितीन गडकरी यांचा प्रयत्न आहे.

**- सुनील जावडेकर**

# ‘आता हीच तर कुठे सुरुवात आहे...’

मुंबई डॉट कॉम



मुंबईची दुसरी लाईफ लाईन असलेल्या बेस्ट उपक्रमाबद्दल गेले महिनाभर बेस्ट उपक्रमाची व्यथा या सदराखाली बेस्ट उपक्रमामधील प्रश्न, सध्याची परिस्थिती यावर प्रकाश टाकणारी एक मालिका प्रकाशित केली गेली आणि त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला. योगायोग बघा, याच आठवड्यात खासदार नारायण राणे यांनी स्वतः पुढाकार घेऊन बेस्ट उपक्रम वाचवण्यासाठी तो टिकवण्यासाठी त्याला पूर्वीचे पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी पाऊल उचलले आणि उदास झालेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांमध्ये एक प्रकारे नवी आशा निर्माण झाल्याचे चित्र आहे. तसे पाहता केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि बेस्टचे खूप जुने नाते आहे. नारायण राणे यांनी एकेकाळी बेस्टचे समिती अध्यक्षपद तीन वर्षे भूषवले होते. त्यावेळी बेस्टच्या आर्थिक परिस्थिती ही चांगली होती. कारण त्यावेळेस तोट्यात चालणाऱ्या परिवहन विभागाचा तोटा हा फायद्यात असणाऱ्या विद्युत पुरवठा विभागातून वळवला जात असे. त्यामुळे मुंबईकरांना एक दर्जेदार बस सेवा व अखंडितपणे विद्युत पुरवठा मिळत असे त्यामुळे बेस्टमध्ये नोकरी मिळवणे एक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. मात्र आज परिस्थिती ही खूपच बदलली आहे.

गेल्याच आठवड्यात खासदार नारायण राणे यांनी बेस्ट महाव्यवस्थापक एस व्ही आर श्रीनिवासन यांची भेट घेतली. गेली कित्येक वर्षे बेस्ट उपक्रमात नारायण राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना कार्यरत आहे. डिसेंबर २००७ साली स्थापन झालेल्या या समर्थ बेस्ट कामगार संघटना आजपर्यंत कामगार व अधिकाऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे काम अखंडपणे करत आहे. मात्र त्यांचे हे काम अत्यंत शांतपणे व निस्वार्थीपणे अखंड सुरू आहे. साहजिकच त्याला खासदार नारायण राणे व मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची भक्कम साथ आहे. कोणताही गाजावाजा न करता महाव्यवस्थापकांना भेटणे व कामगारांना योग्य व उचित न्याय देणे अशी सर्व कामे सध्याचे जनरल सेक्रेटरी विलास पवार आपल्या सहकाऱ्यांमार्फत अखंडपणे करत आहेत या संघटनेमार्फत करत आहेत. मात्र यावेळी खुद्द या संघटनेचे संस्थापक नेते व खासदार नारायण राणे यांनी स्वतः पुढाकार घेऊन बेस्ट महाव्यवस्थापकांची भेट घेतली व संघटनेतर्फे आपल्या मागण्या त्यांच्या पुढे ठेवल्या, मात्र तत्पूर्वी त्यांनी बेस्ट व्यवस्थापकांकडून बेस्टची सध्याची आर्थिक परिस्थिती व समस्या या एका बैठकीद्वारे समजावून घेतल्या. त्यातून बेस्ट महाव्यवस्थापकांची सध्याची हतबलता त्यांना दिसून आली. कारण आर्थिकदृष्ट्या बेस्ट आता पूर्णपणे कोलमडून पडलेली असून आता बेस्टला ना मुंबई महापालिका वाचवू शकत ना दुसरे कोणी... तर बेस्टला आता खरी गरज आहे, ती राज्य सरकारच्या भक्कम आर्थिक पाठबळाची. यावेळी नारायण राणे यांनी बेस्ट महाव्यवस्थापकासमोर काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. ज्याने बेस्ट उपक्रमाला एक पाठबळ मिळू शकेल. बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात करण्याबाबत. ऑगस्ट २०१७ साली बेस्ट समितीने क अर्थसंकल्प मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करण्याचा ठराव पारित केला होता. पुढे तो महानगरपालिकेच्या सभागृहात ऑक्टोबर २०१७ साली एकमताने मंजूर झाला. मंजूर झालेला हा ठराव नगरविकास खात्याकडे पाठवण्यात आला मात्र या ठरावाबाबत नंतर कोणतीही कारवाई झाली नाही. यावर आपण लवकरच महापालिकेशी संपर्क साधून याविषयी बोलणार असल्याचे महाव्यवस्थापकांनी सांगितले, तर दुसऱ्या मुद्द्यात बेस्टच्या स्वमालकीच्या ३ हजार ३३७ बस गाड्यांचा ताफा अबाधित राहणे हा होता.

२०१९ या वर्षी कामगार संघटनेबरोबर बेस्ट उपक्रमात झालेल्या सामंजस्य करारानुसार बेस्टच्या सम मालकीच्या ३ हजार ३३७ बस गाड्यांचा ताफा अबाधित ठेवणे व जसजशा बस गाड्या त्यांच्या आयुर्मानानुसार मोडीत निघतील त्या नवीन घेण्यासाठी मुंबई महापालिकेने निधी पुरवावा या गोष्टीवर ठोस कारवाई अजूनही झालेली नाही. त्यावर महाव्यवस्थापक यांनी पालिकेने दिलेल्या पैशांवर सध्या तीनशे बस गाड्या घेता येतील. मात्र सध्या बेस्टचा स्वमालकीचा बस ताफा असाच ७५०असून बेस्टला स्वमालकीच्या आणखी पाच हजार बस गाड्या घेण्याची गरज आहे. त्यासाठी निधीही मोठा लागणार आहे. बेस्ट उपक्रमाची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा थकीत कोविड पत्ता मिळण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. बेस्ट उपक्रमाचे सेवक वर्गाच्या २०२१ या वर्षाचा सुमारे ७८ कोटींचा थकीत कोविड भत्ता हा त्यावेळी ते तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तत्कालीन महाव्यवस्थापक अनिल यांच्याकडे धनादेशाद्वारे सुपूर्त करण्यात आला होता व तो अद्यापही सेवक वर्गाला वाटला गेला नाही. ७८ कोटींचा थकीत कोविड पत्ता कोविडमध्ये काम केलेल्या सेवक वर्गाला त्वरित वाटणे याविषयी होता मात्र याविषयी बेस्ट महाव्यवस्थापकांनी सध्या आपण यात लक्ष घालून लवकरात लवकर देण्याचे तो प्रयत्न करू असे आश्वासन नारायण राणे यांना दिले, तर चौथा मुद्दा हा अतिशय महत्त्वपूर्ण होता. त्यात बेस्टच्या निवृत्त सेवक वर्गाला थकीत देणी त्वरित मिळण्यात यावी याबाबतीत होती. बेस्ट उपक्रमाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या सेवक वर्गाला त्यांची निवृत्ती नंतरची देणी मिळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने आवश्यक निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.

आपण या कामगारांच्या मागण्यांना न्याय देऊ असे आश्वासन त्यांनी नारायण राणे यांना दिले, तर पाचवा विषय हा बेस्ट उपक्रमातील वाहतूक विभागातील कर्मचाऱ्याशी निगडीत होता. त्यावर आपण लवकरच बैठक बोलावून तोडगा काढू व कर्मचाऱ्यांना न्याय देऊ असे आश्वासन नारायण राणे यांना दिले. अजून बरेच विषय आहेत, मात्र आपण त्यानंतर व्यवस्थापकांची भेट घेऊन मांडू व बेस्ट कर्मचाऱ्यांना न्याय देऊ असे नारायण राणे यांनी यावेळी स्पष्ट केले. मात्र हीच कुठून तरी सुरुवात आहे. एकेकाळी बेस्टशी एक हळुवार नाते असणाऱ्या नारायण राणे यांना मनात बेस्टबद्दल अजूनही एक हळवा कोपरा आहे. कित्येक वर्षांनंतर बेस्ट भवन कुलाबा येथे आल्यानंतर त्यांच्या जुन्या आठवणींना एक त्या निमित्ताने उजाळा मिळाला. सध्या बेस्टची आर्थिक डबघाईला आलेली स्थिती सुधारणे, आता महाव्यवस्थापकांच्या हाती राहिले नाही. मुंबई महापालिका प्रशासनाकडे त्याचे उत्तर नाही, त्यामुळे राज्य सरकारने बेस्ट उपक्रमाला आर्थिक सहाय्य केले आणि भविष्यासाठी उत्पन्नाचा स्तोत्र निर्माण केला, तरच बेस्ट जगेल हे वास्तव आहे. नारायण राणे यांनी येत्या दहा दिवसांत आपण पुढाकार घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्याबरोबर संयुक्त बैठक घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी दिले. आजपर्यंत बेस्ट उपक्रमाच्या विविध प्रश्नांवर आतापर्यंत कोणताही तोडगा प्रशासकीय आणि राजकीय पातळीवरून निघालेला नाही त्यासाठी आता नारायण राणे यांनीच प्रत्यक्ष पुढाकार घेतला आहे.

**- अल्पेश म्हात्रे**




## पहिलीपासून हिंदीची सक्ती नकोच

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या नावाखाली महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णया विरोधात महाराष्ट्रभरातून लोकांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून सामान्य जनतेने देखील सरकारच्या या निर्णयावर सखेद आश्चर्य व्यक्त केले आहे. वास्तविक अलीकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला असताना मराठी भाषेच्या विकासाला प्राधान्य देऊन मराठी भाषेतील साहित्य, कला आणि संस्कृती जगापुढे आणण्यासाठी, तिच्या दैनंदिन व्यवहारातील वापरासाठी उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी राज्य सरकार महाराष्ट्राला गरज नसताना महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठांमध्ये हिंदीच्या शिक्षणावर अफाट खर्च करत आहे. त्यातच आता महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या महाराष्ट्र सरकारचा निर्णय अनाकलनीय आहे. शिक्षणात देशाच्या अहिंदी पट्ट्यातील महाराष्ट्र आदी राज्ये त्रिभाषासूत्रानुसार तिसरी भाषा 'हिंदी' शिकवतात. पण उत्तरेतील नऊ दहा हिंदी भाषिक राज्यांपैकी एकही राज्य कोणतीही इतर भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकवत नाहीत. उलट इतर भारतीय भाषा शिकावी लागू नये म्हणून व्यवहारात नसलेली संस्कृत भाषा तिसरी भाषा म्हणून शिकवतात. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रात आधीच पाचवीपासून हिंदी भाषा शिकवली जात असताना आता पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याचे प्रयोजन काय हे न उलगडलेले कोडे आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व), मुंबई

## कान टोचणे...

राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील तामिळनाडू सरकार विरुद्ध तामिळनाडू राज्यपाल या खटल्यात दिलेल्या निर्णयावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी चिंता व्यक्त केलीय. भारतात काही अशी लोकशाही नाही की, जिथे न्यायाधीश कायदे करतील, कार्यकारी कार्ये करतील आणि ‘सुपर पार्लमेंट’ म्हणून काम करतील. याआधी केरळ राज्याचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची प्रतिक्रिया ही सुद्धा न्यायालयाची डोळे उघडणारी आहे. सर्वोच्च न्यायालयाने तीन महिन्यांची मर्यादा घालणे म्हणजे न्यायालयाकडून घटना दुरुस्ती करण्यासारखेच आहे. दोन न्यायाधीश संविधानाचे स्वरूप बदलू शकत नाहीत. न्याय व्यवस्थापन न्यायालयात वर्षानुवर्षे अनेक खटले प्रलंबित ठेवते त्यावर काही कारवाई करत नाही. सर्वोच्च न्यायालय हे भारतीय संविधानानुसार देशातील सर्वोच्च न्यायिक संस्था आहे. भारताचे राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती करतात आणि ते त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवतात; परंतु सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींच्या निर्णयांवर देखरेख ठेवू शकत नाही. आज देशात अगणित खटले न्यायासाठी प्रलंबित आहे. त्यात नवीन खटले रोज हजारांच्या संख्येने दाखल होतात. न्यायालयाद्वारा त्यावर ना उपाय ना धोरण पण देशाच्या सर्वोच्च संवैधानिक पदावर बसणाऱ्या देशाच्या राष्ट्रपती आणि राज्यपालांना मात्र काल मर्यादा हा कुठला न्याय आहे. या निकालाने मात्र परत एकदा न्यायालये आणि केंद्र सरकार यांची अधिकारांची नव्याने लढाई सुरू झाली आहे.

**- अविनाश देशपांडे,** पुणे

## मुंबईला आणखी एक धरण हवे...

वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर मुंबईची तहान भागवण्यासाठी गारगाई धरणातून अतिरिक्त ४४० दशलक्ष लिटर पाणी मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. दिवसाला सुमारे ६०० दशलक्ष लिटर इतकी पाण्याची तूट सध्या मुंबई अनुभवते. गारगाई धरणाने मुंबईची तहान पूर्ण भागणार नसून १६० दशलक्ष लिटर इतकी पाण्याची तूट तरीही भासणार आहे. पाण्याची तूट वाढणार असल्याने पायाभूत सुविधा व विकास यातील दरी सांधण्यासाठी आणखी एका धरणाचा प्रकल्प हाती घेणे अपरिहार्य आहे. गेल्या दीडशे वर्षांत मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी सातच जलाशय तयार झाले आहेत. मुंबईची लोकसंख्या किती पटीने वाढली आहे आणि वाढत याचा विचार करावा लागेल. मुंबईत विहीर व कूपनलिकातून टँकरने अनेक रहिवासी सोसायट्यांमधून खासगी पाणीपुरवठा होत आहे. या पाणीपुरवठ्याचा विचार केल्यास पाण्याची तूट आणखी वाढले. राज्य सरकारला वेगाने वाढणाऱ्या मुंबई शहरासाठी आणखी एका धरणाचा आताच विचार सुरू करावा लागेल. तहान लागल्यावर विहीर खणू नका.

**- विवेक तवटे ,** कळवा-ठाणे

## राशिभविष्य

सोमवार, २१ एप्रिल २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती चैत्र कृष्ण अष्टमी, शके १९४७. चंद्र नक्षत्र उत्तराषाढा, योग साध्व. चंद्र राशी मकर. भारतीय सौर वैशाख शके १९४७ सोमवार दिनांक २१ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१७ मुंबईचा चंद्रोदय ११.५९, मुंबईचा सूर्यास्त ६.५७ मुंबईचा चंद्रास्त १०.०१ राहू काळ २.१२ ते ३.४७. कालाष्टमी, शुभदिवस.

**|| भविष्य ||**

**मेष :** सुवार्ता मिळतील.

**वृषभ :** व्यावसायिक प्राप्ती वाढेल.

**मिथुन :** गाठीभेटी यशस्वी होतील.

**कर्क :** नोकरीधंद्यात अनुकूलता लाभेल.

**सिंह :** व्यावसायिक मोठे लाभ मिळू शकतात.

**कन्या :** घरातील वातावरण चांगले राहील.

**तूळ :** पूर्वी केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल .

**वृश्चिक :** नव्या ओळखीतून लाभ होतील .

**धनू :** मोठ्या उलाढाली होतील.

**मकर :** वातावरण सुखदायक राहील.

**कुंभ :** नवीन आव्हाने स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागेल.

**मीन :** कलाकारांचे भाग्योदय .

# राखी वटवट्या



इवलासा चिमणीसारखा अस्थिर जीव जेमतेम दहा-बारा सेंटीमीटरचा. नाकापासून ते पाठीपर्यंत काळ्या रंगाचे पंख, बारीकशी मजबूत राखाडी काळपट चोच, थोडीशी लांब आणि पातळ शेपटी जिच्या कोपऱ्यावर काळे ठिपके आणि पांढरी किनार, राखाडी तपकिरी पाठ, पंख उघडल्यावर अर्धगोलाकार आकारात असणारे राखाडी पंख, पिवळसर-पांढरे पोट, लाल डोळे आणि लालसर पाय असे एकूण सौंदर्य "राखाडी वटवट्याचे". नर आणि मादी तसे दिसायला सारखेच त्यामुळे त्यांना ओळखणे कठीण जाते. नैसर्गिक शरीर शास्त्राप्रमाणे यांच्या शरीराचे संतुलन व्हावे म्हणून यांची शेपूट थोडीशी लांबच असते. त्या शेपटीचा उपयोग हवेत झुलण्यासाठी होतो. तार छेडल्यासारखा आवाज त्यांच्या पंखांमधून किंवा शेपटीतून येत असावा असे वैज्ञानिकांचे दुमत आहे. आपल्या चिमणीचा चिवचिवाट हा थांबून थांबून येत असतो; परंतु या वटवट्याचा आवाज सतत न थांबता करत असल्यामुळे खरच वटवट केल्यासारख वाटतं म्हणूनच याचे नाव वटवट्या पडले असावे. हा चालत नाही छोट्या छोट्या उड्या मारतो, सरळ शेपटी आणि त्याच्या तारस्वरामुळे हा लगेच ओळखता येतो.

राखी वटवट्या याचे शास्त्रीय नाव प्रीनिया सोशिऑलिस. इंग्रजीत Ashy Prinia ॲशी प्रीनिया. ही जल्पकाद्य पक्षीकुळातील भारतीय उपखंडात आढळणारी पक्ष्यांची प्रजाती आहे. ॲशी प्रीनिया किंवा ॲशी रेन-वॉर्बलर (प्रीनिया सोशलिस) सिस्टिकोलिडे कुटुंबातील एक लहान वार्बलर आहे. भारत, नेपाळ, बांगलादेश, पूर्व पाकिस्तान, भूतान, श्रीलंका आणि पश्चिम म्यानमार या भागांत यांचे वास्तव्य असते. पिवळ्या पोटाचा प्रीनिया संपूर्ण इंडो-गंगा आणि ब्रह्मपुत्रा येथे विशेषतः पाण्याजवळ उंच, ओलसर वनस्पतींमध्ये आढळतो. हा शहरात, बागेत, नदीकिनारी दिसत असून सामाजिक पक्षी आहे. यांच्या अंदाजे २९ जाती आढळतात. हे लहान पक्षी सहसा स्थलांतरित होत नाही.

हे पक्षी प्रामुख्याने कीटक आणि त्यांच्या अळ्या, लहान कोळी खातात, तसेच फुलांचा रस देखील खातात. सरडे, साप, मोठे पक्षी यांचे हे भक्ष्य बनतात. हे एकटे किंवा जोड्यांमध्ये दिसतात. जंगल प्रीनिया आकाराने जवळजवळ बुलबुलसारखी असते आणि प्रजनन काळात मादीचा चेहरा राखाडी रंगाचा आणि बाहेरील शेपटीचे पंख पांढरेशुभ्र आणि जाड चोच जास्त काळपट दिसते. म्हणजेच प्रजनन काळात यांचे रंग गडद होतात. आपल्याप्रमाणे इतर सजीव सृष्टीतील सर्व घटकांमधील मादी ही प्रजनन काळात खूप सुंदर म्हणजेच तिचे रंग गडद व्हायला लागतात.



निसर्गवेद

डॉ. महालक्ष्मी वानखेडकर

या पक्ष्यांची मला नेहमीच गंमत वाटते यांनी घातलेल्या सादीचे प्रतिउत्तर अतिशय दुरून हलकेच आपल्या कानी पडतात. बऱ्याचदा वाटत असतं काय बोलत असावे हे? हा आवाज सकाळच्या वेळेला खूप येतो. कारण हे तेव्हा आपल्यासारखेच खूप उत्साही असतात आणि सततच्या यांच्या हावभावांवरून मला निरीक्षणाअंतर्गत काही गोष्टी जाणवल्या. पक्षी दिवसभरामध्ये खूप वेगवेगळे आवाज काढतात आणि बोलत असतात. सकाळी उठल्यावर त्यांची प्रार्थना गीत झाल्यानंतर त्यांची एकमेकांना असणारी साद दिवसभराचे प्लॅनिंग करण्यासाठीच असते. म्हणजे अन्न-पाण्याच्या शोधार्थ कुठल्या दिशेने जावे हे ते ठरवतात. पाच वाजेदरम्यान येणारा कलकलाट परत घरी निघण्यासाठी. प्रजनन काळात असणारी साद ही मधुर असून त्यांच्या साथीदारासाठी असणारी एक आकर्षक ओढ जी कधी मिलन करण्यासाठी, तर कधी घरटे दाखवण्यासाठी असते. एकाच वेळेला बरेच वेगवेगळे ध्वनी हे काढतात. वटवट्या एकमेकांना आकर्षित करण्यासाठी चिप-चिप, झिप-झिप असा कर्कश; परंतु चिमणीसारखा न थांबता येणारा आवाज काढतो. हा कर्कश असला तरी मधुर वाटतो. अशी मधुर गाणी गात असताना मान सगळीकडे फिरवत असतो. कदाचित त्याच्या साथीदाराला शोधत असावा. ज्या दिशेने त्याच्या साथीदाराची साद येत असते त्या दिशेला पाहून ते जास्त ओरडताना दिसतात. मादीचे प्रतिउत्तर अतिशय गोड आणि हळुवार आवाजात असते. जेव्हा ते घरटे बांधायला सुरुवात करतात तेव्हा न थांबता ते खूप बोलत असतात आणि सतत मादीला साद घालून सांगत असतात. तसा हा आळशी पण तार स्वरात आवाज करून लक्ष वेधून घेण्यात नंबर एक.

नर आणि मादी मिळून दोन अडीच फुटांवर घरटे बांधतात. पान, गवताची तूस, प्राण्यांचे केस, कोळ्याचे जाळे यांचा उपयोग करून झाडांच्या फांद्यांमध्ये किंवा उंच गवतांमध्ये घरटे बांधले जाते. मोठ्या पानांचा आधार घेऊन छोट्या-छोट्या झुडपांमध्ये अगदी सुगरणीसारखे त्या पानांमध्ये अतिशय सुबक पद्धतीने घरटे गुंफले जाते. सर्व पक्ष्यांची खूपच कमाल वाटते. प्रत्येक पक्षी आपल्या सोयीनुसार आणि स्वतःच्या क्षमतेनुसारच अतिशय नरम, सुंदर नाजूक घरट्याची बांधणी करत असतात. पावसाळ्यानंतर चमकदार, लालसर, तपकिरी रंगाची नाजूकशी दोन ते चार अंडी देते. घरटे झाडांच्या पानांमध्ये लपलेले असले तरी अशा पद्धतीने आजूबाजूची पाने बाजूला सारतात की त्यांना मोकळे आकाश सहज दिसते; परंतु त्यांचे घरटे कोणालाही दिसत नाही. जेव्हा अंड्यातून पिल्लं बाहेर येतात तेव्हा मादी शिकार करून आणते आणि त्यांना खाऊ घालते. नर आणि मादी दोघेही मिळून या पिल्लांचे संगोपन करतात. शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी पिल्ले सतत चोची उघडून अन्नाची वाट पाहत असतात. पौष्टिक कीटकांचा आहार मिळाल्यास ही पिल्लं लवकर सुदृढ होतात. जेव्हा ही पिल्लं उडण्यासाठी सक्षम होतात तेव्हा एक एक जण फांद्यांवर येऊन उभे राहतात. फांद्यांवरच इकडून तिकडे उडत राहतात. आई शिकार करून आणून सुरुवातीला त्यांना भरवते आणि मग ही हळूहळू घरट्याच्या बाहेर राहायला सुरुवात करतात. शारीरिक क्षमता आल्यावर ही पिल्ले उडून जातात म्हणजेच स्वावलंबी होतात.

यांच्या बाबतीत एक गोष्ट घडते ज्याच अत्यंत वाईट वाटतं. काही पक्ष्यांच्या बाबतीत सुद्धा ती होते. परजीवी पक्षी म्हणजे जे स्वतः घरटे बांधत नाहीत दुसऱ्यांच्या घरट्यात आपली अंडी देतात असे काही पक्षी आहेत जसे पावशा पक्षी. हा या राखी वटवट्याच्या घरट्यात आपले अंडे देतो आणि बिचाऱ्या या वटवट्याला ते समजतच नाही. ती आपल्या पिल्लांप्रमाणे त्यांचा सांभाळ करते पण इतर पिल्लांपेक्षा या पावशाचं पिल्लू नक्कीच मोठं दिसत असलं तरी ती अत्यंत प्रेमाने त्याला खाऊ पिऊ घालते. यातूनच या पक्ष्यांमध्ये असणारी ममता, वात्सल्य दिसून येते. हे खरोखर इतरांची खूप काळजी घेतात.

सामान्य रीड म्हणून ओळखले जाणारे गवत कुटुंबातील फुलांच्या वनस्पतींची एक प्रजाती आहे. यामध्ये या वटवट्याला घरटे बांधणे आवडते. ज्यापासून अनेक वस्तू बनवल्या जातात. त्यामुळे हे गवत कापण्यापूर्वी जाळले जाते आणि मग त्यामध्येच यांची घरटी, पिल्लं आणि हे पक्षी सर्वकाही नष्ट होते. या साध्या भोळ्या निरागस असणाऱ्या बिचाऱ्यांचे दुर्दैव आणि आपली विध्वंसकता. माझ्या सर्व लेखांमध्ये या निसर्ग घटकांची आपण आपल्या स्वार्थासाठी कशा पद्धतीने विध्वंसकता करतो हे लक्षात येईल. आता ही विध्वंसकता कळत असते की, नकळत असते याचा आपण विचार करावा आणि जमेल तेवढं यांना वाचवण्यासाठी आपणच प्रयत्नशील राहावे. जर प्रत्येकाने हा प्रयत्न केला तरच हे घटक वाचवू शकतो. हे वाचले तरच आपण वाचू हे मनात कोरून ठेवा.


dr.mahalaxmiwankhedkar@gmail.com


# "ठाऊक आहे का तूज काही?"



चित्रपटसृष्टीतील जुन्या कलाकारांनी, विशेषतः गीतकारांनी, सगळ्या नात्यांना किती सुंदरपणे प्रेक्षकांसमोर आणले ते पाहिले की कौतुक वाटते. अर्थात त्यासाठी जुने सिनेमा पाहायला, जुनी गाणी ऐकायला हवीत. आईवडील-मुले, काका-पुतणे, मामा-भाचे, आजोबाआजी-नातू, प्रियकर-प्रेयसी, मित्र-मैत्रीण इतकेच काय शत्रूच्या नात्यावरही सुंदर सिनेगीते आहेत.

मात्र सर्वांनाच तशा रसरसलेल्या नात्यांचे सुख मिळते असे नाही. काही मुले जन्मतात ती अनाथ म्हणून! कारण बाळंतपणात त्यांच्या मातेचे निधन झालेले असते. इतरांकडे बघून त्या अनाथ मुलांनाही आपली आई कशी होती ते जाणून घ्यायची उत्सुकता असते. त्यावरच मराठीत एक सुंदर गाणे होते. चित्रपट होता १९६१चा 'एक धागा सुखाचा'. कलाकार मराठीतले एके काळचे दिग्गज-रमेश देव, नलिनी सराफ (नंतरची सीमा देव), उषा किरण, दामूअण्णा मालवणकर, शरद तळवलकर, धुमाळ, मधू आपटे, शांता बेडेकर, हनी इराणी, राम टिपणीस इ. दिग्दर्शक होते दत्ता धर्माधिकारी, संगीतकार राम कदम आणि गीतकार मधुकर जोशी व मधुसूदन कालेलकर.

अनंतची(रमेश देव) पहिली पत्नी मालती (उषा किरण) बाळंतपणानंतर मरण पावते. त्यामुळे जन्माला आलेल्या 'संजय'वर (मुलावर) अनंतचा आधीपासून राग असतो. मरताना मालतीने बाळाला आई असावी म्हणून दुसरे लग्न करा अशी पतीला विनंती केलेली असते. जवळजवळ ५ वर्षांनंतर त्याच्या प्रेमात हेमा (सीमा) पडते आणि ते लग्नाचा विचार करू लागतात. त्यावेळी पोलिओग्रस्त संजयची (मुलाची) उपस्थिती रमेश देवला अडथळा वाटल्याने तो आपल्याला मुलगा आहे हे तिला सांगत नाही. जेव्हा ते तिला कळते तेव्हा त्यांच्यात बेबनाव निर्माण होतो. त्यामुळे अनंत मुलाच्या इच्छेविरुद्ध त्याला अनाथाश्रमात ठेवतो. तशात हेमाही त्याला मुलावरून सोडून गेल्याने पहिल्या पत्नीची आठवण येते. तो अंतर्मुख होतो.





अनंता मुलाशी कठोर वागल्यामुळे त्याचा प्रेमळ नोकरही त्याला सोडून जातो. जाताना तो अनंताला चार शब्द सुनावतो. पश्चाताप होऊन अनंत मुलाला परत घरी आणतो. पुन्हा त्याचे हेमाशी भांडण होते. वडिलांना आपल्यामुळे अजून त्रास नको म्हणून बिचारा संजय स्वतःच घर सोडून जातो. घाईघाईत लंगडत जात असताना अपघात होताहोता तो वाचतो. हेमाचे मन ते सगळे बघून द्रवते. पश्चाताप होऊन ती त्याचा स्वीकार करते अशी ही सुखांत कथा!

या सिनेमाची बरीच गाणी लोकप्रिय झाली. त्यात मधुसूदन कालेलकरांच्या मन्ना डे यांनी गायलेल्या, त्याकाळी अतिशय लोकप्रिय झालेल्या-

**"अ अ आई, म म मका,**
**मी तुझा मामा दे मला मुका"**

या गाण्याबरोबरच मधुकर जोशींनी लिहिलेली आणि आशाताईंनी गायलेली-

**"थंडगार ही हवा, त्यात धुंद गारवा,**
**अशा सुरेख संगमी, जवळ तू मला हवा."**

आणि

**"मी लता, तू कल्पतरू.**
**संसार आपला सुखी करू."**

या गाण्यांचा समावेश होता. राम कदमांचे संगीत अप्रतिम होते.

सिनेमात एक अतिशय भावूक प्रसंग होता. संजय वडिलांची वाट पाहत घराबाहेर उभा असतो. रात्र होते तरी ते येत नाहीत. तेवढ्यात ज्या काहीशा वेडसर भिकाऱ्याला दिवंगत मालती प्रेमाने भिक्षा वाढायची तो येऊन संजयशी बोलू लागतो. बोलायला कुणीच नसल्याने संजयही त्याच्याशी आईबद्दल बोलू लागतो. 'माझी आई कशी होती ते तुला ठाऊक आहे का?' असे विचारताना म्हणतो 'मी तिला कधीच पाहिले नाही तू तर नक्की पाहिले असशील ना!'

ज्यांची आई जन्म देताच किंवा बालपणी निवर्तल्याने त्यांना आठवतही नसते केवळ अशा दुर्दैवी व्यक्तींनाच हे गाणे हेलावून टाकते असे नाही. सर्वांनाच गलबलून यावे असा तो अनुभव असतो. कारण आईच्या नात्याची तुलना इतर कोणत्याच नात्याशी होऊ शकत नाही आणि तीच नसणे यासारखे दुःख नाही. दारिद्र्य नाही.

कोणत्याही स्वार्थाशिवाय फक्त आईच प्रेम करू शकते. बाकी सर्व नात्यांना कोणत्या ना कोणत्या हितसंबंधांची किनार असतेच. कालेलकरांनी लिहिलेल्या आणि वसुमती दोंदे व स्नेहल भाटकरांनी गायलेल्या त्या हळव्या गाण्याचे शब्द होते -

**"ठाऊक नाही**
**मज काही,**
**ठाऊक आहे का**
**तुज काही?**
**कशी होती रे**
**माझी आई?"**



नॉस्टॅल्जिया

श्रीनिवास बेलसरे

छोट्या संजयची अवस्था खरच दयनीय आहे. त्याला आई आठवत नाही आणि वडील त्याचा जन्मापासून तिरस्कार करतात. म्हणून निदान आईचे तरी माझ्यावर प्रेम असावे अशी त्याला आशा आहे. ते जाणून घ्यायची उत्सुकता आहे. तेही त्याला विचारावे लागते ते दारावर येणाऱ्या भिकाऱ्याला! पण त्यातूनही कालेलकरांनी त्या प्रसंगावरही हृदयाला भिडणारे गाणे तयार केले होते. संजय विचारतो -

**"मऊ जशी ती साय दुधाची,**
**होती आई का तशी मायेची.**
**बागेतील ते कमल मनोहर,**
**आई होती का तशीच सुंदर?**
**देवाघरी का एकटी जाई,**
**ठाऊक आहे का तुज काही?**
**कशी होती रे माझी आई..."**

त्याकाळी समाजात आजच्यासारखी वास्तवाची जाण, चतुरपणा, भावनेचा कोरडेपणा आलेला नव्हता. माणूस खूप भावनाप्रधान, भाबडा, होता. त्यामुळे लहान मुलांना घरात कुणाचा मृत्यू झाला, तर सांगितले जायचे 'तो देवाघरी गेला.' त्या निरागस जीवांना ते खरेही वाटायचे. म्हणून संजयला वाटते माझी आई देवाघरी जाताना मला घेऊन का गेली नाही, मला एकटे टाकून का गेली? या वाक्याची भेदकता प्रेक्षकाला हळवे करते. संजयच्या बालमनात येणाऱ्या मोजमापातूनच तो आईची कल्पना करतो. तसेच प्रश्न तो त्या भिकाऱ्याला विचारतो -

चिऊ-काऊची कथा चिमुकली,
सांगत होती का ती सगळी.
आम्हांसारखे शुभंकरोती,
म्हणे रोज का देवापुढती?
गात असे का ती अंगाई,
ठाऊक आहे का तुज काही?
कशी होती रे माझी आई?

पुढचे कडवे स्नेहल भाटकर यांच्या आवाजात आहे. आता भिकारी वत्सलतेने संजयला आईची महती सांगतो. त्याला समजवताना तो स्वतःचेही दुःख सांगून जातो की त्यालाही आई नाही -

**"मऊ सायीहून आई प्रेमळ,**
**गंगेहून ती आहे निर्मळ.**
**अमृताचे घास भरविते,**
**आभाळापरी माया करीते.**
**आईवाचून मीही विरही,**
**ठाऊक आहे का तुज काही...**
**कशी होती रे माझी आई..."**

शेवटी आईचे जाणे म्हणजे माणसाचे भावविश्व किती पोकळ करणारा अनुभव असतो! पण प्रत्येकाला तो कधीतरी घ्यावाच लागतो. म्हणून ही गाणी!

# साहित्य म्हणजे नेमकं काय ?




या प्रश्नाचं बाळबोध उत्तर- काहीतरी साध्य करण्यासाठी लागणारं सामान म्हणजे साहित्य. बागेत फुलझाडं लावायची असली, तर कुदळ, फावडं, खोरं, घमेलं, झारी, कात्री, दोरी वगैरे जे सामान आवश्यक असतं त्याला आपण बागकामाचं साहित्य म्हणतो. घरबांधणीसाठी दगड, विटा, चुना, रेती, सिमेंट, लोखंडी सळ्या आणि लाकडे वगैरे जे सामान आवश्यक असतं त्याला आपण बांधकामाचं साहित्य असं म्हणतो. पण तरीदेखील केवळ साहित्य असा शब्द उच्चारला म्हणजे आपल्याला जाणीव होते ती वाङ्मयातील साहित्याची.

पेन, पेन्सिल, कागद, शाई हे साहित्य निर्माण करण्यासाठी लागणारं सामान झालं, पण साहित्यिक भाषेत ज्याला 'साहित्य' म्हणतात ते साहित्य म्हणजे नेमकं काय? या साहित्याची व्याख्या करणं जरा अवघडच आहे. कारण साहित्य म्हणजे काही एक, दोन, तीन असं मोजून दाखवता येणारं सामान नव्हे. कथा, कादंबरी, कविता, नाटक हे साहित्याचे प्रकार झाले. पण या साऱ्यातून जे व्यक्त होतं ते साहित्य.

साहित्य या शब्दाची व्याख्या करताना एक थोर तत्त्वचिंतक म्हणतो, त्या पालकांना हे देखील कळत होतं की, या मार्कांच्या मागे धावण्याच्या नादात मुलांचं मूलपणच हरवत चाललंय.

'या जीवघेण्या स्पर्धांनी जीव नकोसा झालाय,' असा सूर बहुसंख्य पालकांच्या बोलण्यातून आढळला. तरीसुद्धा या स्पर्धेच्या युगात आपलं मूल कुठंही मागं पडू नये, म्हणून प्रत्येक पालकाची धडपड होती.



संवाद

गुरुनाथ तेंडुलकर

त्या सामाजिक संस्थेनं शेवटी या गैरहजेरीच्या मुळाशी, सध्याची जगातली ही स्पर्धा असल्याचे निष्कर्ष काढले होते.

खरंच, आजचं युग हे स्पर्धेचं युग आहे. स्पर्धा या शब्दाला इंग्रजीत प्रतिशब्द 'कॉम्पिटिशन' असा आहे. 'कॉम्पिट' म्हणजे एकमेकांशी झुंजणे, चढाओढ. इतरांपेक्षा मी अधिक श्रेष्ठ आहे हे सिद्ध करण्याची धडपड, अहमहमिका.

माणसाच्या आयुष्यात ही स्पर्धा नेमकी केव्हा आणि कशी सुरू झाली हे नेमकं सांगणं कठीण आहे तरीसुद्धा एक मानसशास्त्रीय अंदाज या संदर्भात मांडला जातो.

माणसाला अगदी सुरुवातीला, त्याच्या अगदी आदीम अवस्थेत असताना, सभोवालच्या जंगलातील जनावरांपासून भय होतं. रानातील इतर जंगली श्वापदांच्या तुलनेनं माणूस तसा दुबळाच. तेव्हा त्या पशुंशी स्पर्धा करून जिंकण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. त्या स्पर्धेत हार म्हणजे केवळ मृत्यू.

जगण्यासाठी आवश्यक अशा या स्पर्धेत केवळ भाग घेऊन चालण्यासारखं नव्हतं, तर जिंकणंही तितकंच आवश्यक होतं. माणूस जीवाची बाजी लावून या स्पर्धेत उतरला आणि जिंकला. शारीरिक बळावर नव्हे, तर केवळ बुद्धीच्या जोरावर. निसर्गातल्या इतर प्राण्यांबरोबरची ही स्पर्धा माणसानं जिंकली आणि त्यानंतर माणूस हा केवळ सामान्य प्राणी राहिला नाही. माणूस सृष्टीचा राजा ठरला. कधी निसर्गाशीसुद्धा दोन हात करून, तर कधी निसर्गाच्या हातात हात घालून माणूस सृष्टीतल्या सर्व प्राण्यांबरोबरची स्पर्धा जिंकत गेला.

'माणूस' नावाच्या प्राण्याबरोबर स्पर्धा करू शकेल असा एकही प्राणी उरला नाही. मग ही स्पर्धा माणसामाणसांत सुरू झाली. निसर्गातील इतर प्राण्यांपेक्षा आपण वेगळे आहोत, याची तर त्याला जाणीव झालीच होती, पण आपल्यासारख्याच इतर माणसांहूनही मी भिन्न आहे, याचीही त्याला जाणीव झाली आणि हे वेगळेपण जपायचं, त्याचा नीट उपयोग करून आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करायचं, या भावनेतून स्पर्धा सुरू झाली. ही माणसामाणसांतील स्पर्धा सुरू झाली मात्र आणि नंतर माणसाच्या जीवनाला एक वेगळीच गती प्राप्त झाली. इतरांपेक्षा मी वेगळा आहे, श्रेष्ठ आहे हे सिद्ध करण्यासाठी काहीतरी भव्य-दिव्य करायला हवं या ऊर्मीपोटीच तर माणूस आजवरचे प्रगतीचे नवनवे टप्पे गाठू शकला. यशाचे नवनवे उच्चांक गाठताना पूर्वीच्या उच्चांकांशी स्पर्धा करणं हे तर क्रमप्राप्तच होतंच.

आज आपण विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, कला आणि क्रीडासारख्या सर्व क्षेत्रात जे नेत्रदीपक यश पाहतोय याचं महत्त्वाचं कारण म्हणजे ही स्पर्धेची वृत्ती. इतरांपेक्षा मी जलद पोहोचेन, या ऊर्मीतूनच निरनिराळ्या वाहनांचा शोध लागत गेला. इतरांपेक्षा आपली उत्पादनक्षमता वाढावी, या भावनेतूनच अनेक यंत्रं निर्माण झाली. इथंवर सारं काही व्यवस्थित होतं, पण पुढे या निकोप स्पर्धेत ईर्षा घुसली आणि तिथून माणसाच्या अधःपतनाला आरंभ झाला. मी मोठा हे सिद्ध करायचं असेल, तर दुसऱ्याला लहान ठरवायला हवं, अशी वृत्ती निर्माण झाली. दुसऱ्याच्या यशामुळे आनंद होण्याऐवजी दुःख व्हायला लागलं. असूयेतून माणूस आतल्या आत जळू लागला.

स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी निसर्गाशी दोन हात करणारा, स्वतःच्याच जातभाईंशी लढू लागला. लढाई जिंकण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करू लागला. येनकेन प्रकरणे जिंकायचं आणि पुढं जायचं यासाठी भलेबुरे मार्ग शोधले जाऊ लागले. दुसऱ्याच्या पुढे जाण्यासाठी स्वतःचा वेग वाढवणं यात काहीच वावगं नव्हतं, पण स्वतःचा वेग वाढवण्यापेक्षा, दुसऱ्याचे पाय मागे ओढून त्याला मागे पाडणं अधिक सोपं आहे, हे जाणवल्यानंतर नीती-अनीतीचा विचार न करता यशासाठी शॉर्टकट शोधले जाऊ लागले.

परीक्षेतील यशासाठी शिक्षकांना हाताशी धरून केलेली पेपरफुटी असो किंवा लोकशाही मार्गानं सरकार निवडण्यासाठी होणाऱ्या निवडणुकांतील मतपत्रिका किंवा क्वचित उमेदवारालाही पळवून नेण्याचे प्रकार असो. उद्देश एकच. स्पर्धा जिंकायची. खेळासारख्या मनोरंजनाच्या प्रकारातही मग ही व्यावसायिक वृत्ती घुसली. 'मॅच फिक्सिंग'सारखी प्रकरणं सुरू झाली.
खेळात भ्रष्टाचार घुसला. खेळाचा खेळखंडोबा झाला.

मोठ्या माणसांचं सोडा, पण अगदी तुमच्या आमच्यासारखा सर्वसामान्य माणूससुद्धा या चक्रात कधी ओढला गेला हे कळलंच नाही. याचीच परिणती मग 'तुझ्याजवळ आहे ते माझ्याजवळ असलंच पाहिजे' किंबहुना 'माझ्याजवळ नाही, तर ते तुलादेखील मिळता कामा नये' ही वृत्ती निर्माण झाली.

प्रेमासारख्या उदात्त भावनांतही ही स्पर्धा शिरली आणि परिणामी जी सीता मला मिळाली नाही ती रामाला मिळता कामा नये अशी रावणी वृत्ती निर्माण झाली. रावणानं सीतेचं अपहरण केलं, पण निदान तिला सुरक्षित, सुखरूप तरी ठेवलं; पण हल्ली रिंकू पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे, विद्या प्रभुदेसाई ... प्रेमात हे असले प्रकार आणि युद्धात ? युद्धात तर सगळंच क्षम्य. म्हणूनच की काय शत्रूचा पुरता निःपात करण्यासाठी अणुबॉंब आणि रासायनिक अस्त्रांचे शोध लावण्यास शास्त्रज्ञ प्रवृत्त झाले. स्पर्धा खऱ्या अर्थाने 'जीवघेणी' ठरू लागली आणि या जीवघेण्या स्पर्धांचं उदात्तीकरण करण्यासाठी मग अशा युद्धांना कधी धर्मयुद्ध असं नाव दिलं तर कधी साम्राज्यविस्तार.

आज केवळ मानवजातीला नव्हे, तर पृथ्वीवरची संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आणणारी ही शस्त्रस्पर्धा, अण्वस्त्रस्पर्धा. या स्पर्धा अशाच चालू राहिल्या, तर जगाचा विनाश हा ठरलेलाच. पण या स्पर्धांतील असूया नि मत्सर जर आपण प्रयत्नपूर्वक टाळले, तर या स्पर्धांतून विनाशाऐवजी विकास साधला जाईल, तुमचा, आमचा सर्वांचाच आणि नंतरच माणूस खऱ्या अर्थाने महामानव बनू शकेल.

# शापित चित्रकेतू झाला वृत्रासूर



शुरसेन देशात चित्रकेतू नावाचा एक चक्रवर्ती राजा होता. तो अतिशय धार्मिक, सुंदर, सर्वगुणसंपन्न व प्रजा वत्सल होता. त्याला अनेक राण्या होत्या; परंतु असे असूनही त्याला अपत्य नव्हते. म्हणून तो दुःखी होता. एके दिवशी ब्रह्मदेवाचे पुत्र अंगीरा ऋषी चित्रकेतूकडे आले. चित्रकेतूने त्यांचा योग्य आदरसत्कार केला. त्यांनी चित्रकेतूला तुला काही काळजी आहे का? असा प्रश्न केला तेव्हा चित्रकेतुनी त्यांना आपले दुःख सांगितले. अंगीरांनी एक यज्ञ करून त्याचा प्रसाद राणीसाठी दिला. राजाने तो प्रसाद ज्येष्ठ राणी कृतधृतीला दिला.

कालांतराने कृतधृतीला पुत्र झाला. राजाने त्या प्रित्यर्थ भरपूर दानधर्म केला. पुत्रप्राप्तीमुळे आनंदित झालेल्या राज्याचा अधिकाधिक वेळ कृतधृती व लहान मुलासोबत जाऊ लागला. त्यामुळे अन्य राण्यांमध्ये मत्सर निर्माण झाला. या परिस्थितीला नवजात शिशु कारणीभूत असल्याचे मानून त्या राण्यांनी कटकारस्थान करून नवजात शिशुला विष दिले. त्यामुळे तो मरण पावला. अचानक झालेल्या या घटनेमुळे सर्वजण शोक मग्न झाले. अन्य राण्यांच्या कटकारस्थानापासून अनभिन्न असलेले चित्रकेतू व राणी शोक सागरात बुडून गेले. अन्य राण्यासुद्धा रडण्याचे नाटक करू लागल्या. दुःखातिरेकाने राजा चित्रकेतू बेशुद्ध झाला.

हे पाहून अंगीरा ऋषी नारदासह तेथे आले. त्यांनी शोकमग्न चित्रकेतूची समजूत काढली. तसेच तू आता ज्यांच्यासाठी शोक करतो आहे तो तुझा मागच्या जन्मी कोण होता आणि पुढच्या जन्मातही त्याचा व तुझा काय संबंध असेल? तेव्हा आता शोक करणे व्यर्थ आहे. असा उपदेश केला. तू भगवंताचा भक्त असल्याने तुला शोक होणे योग्य नाही म्हणून तुझ्यावर अनुग्रह करण्यासाठी आम्ही आलो आहोत असे स्पष्ट केले. यापूर्वीच्या भेटीतच तुला अनुग्रह देण्याचा विचार होता; परंतु तुला पुत्राची आस होती म्हणून तुला वास्तवाची जाणीव व्हावी म्हणून तुला पुत्रच दिला. आता पुत्र असला तरीही कसे दुःखाला सामोरे जावे लागते याचा अनुभव तुला आला.

महाभारतातील मोतीकण

भालचंद्र ठोंबरे

तेव्हा नारद म्हणाले " हे राजन ! हे सर्व मिथ्या आहे. तू ध्यान व धारणा करून भगवान संकर्षणाचे दर्शन प्राप्त करून मोक्ष प्राप्ती करून घे''. त्यानंतर चित्रकेतूचा मोह नाहीसा करण्यासाठी त्यांनी मृत राजकुमाराचा जीवात्मा सर्व शोकाकुल राजा व परिवाराला दाखविला. त्या जिवात्म्याला माता-पित्याचा परिचय दिला. तेव्हा तो जिवात्मा म्हणाला, ''मी आपल्या कर्मानुसार अनेक योनीतून भटकत असतो. तेव्हा हे कोणत्या योनीतील माझे माता पिता आहेत? जिवात्म्याला कोणी प्रिय अप्रिय नसतो. आपला परका नसतो. हा नेहमी त्रयस्थ असतो." असे म्हणून जीवात्मा निघून गेला.

जिवात्म्याकडून हे तत्त्वज्ञान ऐकल्यावर राजाचा शोक नाहीसा झाला, व त्याने मुलाच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केला. नारदांनी त्याला भगवान संकर्षणाच्या प्राप्तीचा ध्यानधारणा मार्ग कथन केला व अंगीकारासह निघून गेले. राजा चित्रकेतूने नारदांच्या आदेशाप्रमाणे सात दिवस केवळ पाणी पिऊन अनुष्ठान केले व त्यायोगे त्याला विद्याधरांचे अखंड अधिपत्य मिळाले व तो देवाधिदेव भगवान शेषांच्या चरणाशी पोहोचला. संकर्षणाचे दर्शन झाल्याने त्याची सर्व पापे नष्ट झाली. त्याने भगवंताची स्तुती केली. त्या स्तुतीने प्रसन्न होऊन भगवान संकर्षणांनी चित्रकेतूला नारदांच्या उपदेशाने व माझ्या दर्शनाने तू सिद्ध झाला आहेस असे म्हणून आशीर्वाद व एक विमान दिले. अशा प्रकारे चित्रकेतू भगवंतांनी दिलेल्या विमानातून संचार करीत असता ऋषीमुनींच्या सभेत भगवान शंकरांना माता पार्वतीला मांडीवर घेऊन बसलेले पाहिले. व त्यावर त्याने टिकाटिप्पणी केली. त्यामुळे माता पार्वतीने क्रोधीत होऊन चित्रकेतूला असूर योनीत जाण्याचा शाप दिला. तेव्हा चित्रकेतू माता पार्वतीला नमस्कार करून व शापाचा स्वीकार करून, निघून गेला. हे पाहून माता-पार्वती आश्चर्यचकित झाली.

तेव्हा भगवान शंकर म्हणाले "हा चित्रकेतू भगवान विष्णूंचा परमभक्त आहे, म्हणून तो सर्वांना समान दृष्टीने पाहतो व शांत असतो. मी सुद्धा विष्णूचा प्रिय असल्याने मलाही त्याचा राग येत नाही. त्यामुळे जो विष्णूचा भक्त आहे व जो त्यांच्या प्रति समर्पित आहे असा मनुष्य कोणालाही घाबरत नाही, कारण तो स्वर्ग मोक्ष नरकातही नारायणालाच पाहत असतो."

पार्वतीने दिलेल्या शापामुळे चित्रकेतू पुढच्या जन्मी राक्षसराज वृत्रासूर म्हणून जन्माला आला. मात्र तेथे सुद्धा ज्ञानविज्ञान संपन्न राहिला. त्याचा इंद्राने वध केला. चित्रकेतूचा हा पवित्र इतिहास आणि विष्णू महात्म्य जो ऐकतो तो संसार बंधनातून मुक्त होतो असे श्रीमद् भागवतात सांगितले आहे.

# शिवसंग्रामची पुणे येथून ठरली रणनिती!

## ज्योती मेटे
## राज्यस्तरीय बैठकीत सदस्य नोंदणीची सुरवात

पुण्यभूमी प्रतिनिधी



पुणे:राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याविषयी कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, वारंवार कर्जमाफीवर चर्चा करण्यापेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. त्यांच्या कृषी उत्पादनांना चांगला भाव देण्यासहकृषी उत्पादनावर प्रक्रिया, शेतीक्षेत्रालाबिगरशेती क्षेत्राची जोड, कृषी व सहकार विभागातील समन्वय आणि सहकार व महसूल विभागाच्या समन्वयातून खरीप व रब्बी हंगामात १०० टक्के पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योती विनायक मेटे यांनी केली.

पुण्यातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात शिवसंग्राम पक्षाची राज्यस्तरीय बैठक पार पडली. त्यानंतर ज्योती मेटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश चिटणीस योगेश विचारे, पुणे शहराध्यक्ष भरत लगड, ज्येष्ठ पदाधिकारी शेखर पवार, वसंत पाटील, पी. के. चव्हाण यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्योती मेटे म्हणाल्या, आजच्या बैठकीत छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व स्मृतीस्थळ, तसेच पानिपत येथील मराठ्यांच्या शौर्य इतिहासाच्या प्रतिक असलेले स्मृतीस्थळ उभारणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करते. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होऊनही स्मारकाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष देऊन मुंबई उच्च न्यायालय, तसेच सर्वोच्च न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडून स्मारकाचे कामकाज त्वरित सुरु करावे. स्वराज्य संकल्पक शहाजी महाराजांचे हौदेगिरी (दावणगिरी) कर्नाटक येथे स्मृतीस्थळ उभारणेबाबत कार्यवाही करावी.केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांच्या स्टार्टअपसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने महिलांच्या स्टार्टअपला प्रोत्साहन मिळण्यासाठी जिल्हा स्तरावर इनक्युबेशन सेंटर, जिल्हा उद्योग केंद्रामध्ये विशेष कक्ष निर्माण करावा. महाराष्ट्र शासनातील चतुर्थश्रेणी आणि अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे वय सध्या ६० वर्षे आहे, तर केंद्र शासनासह २५ राज्यांत सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आहे. महाराष्ट्रात मात्र सेवानिवृत्तीचे ५८ वर्षे आहे. त्यामुळे ही बाब अत्यंत अव्यवहार्य आहे. शासन धोरणानुसार ५५ वर्षे वयांवरील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यास पात्रतेनुसार तृतीय श्रेणीत पदोन्नती मिळाली तरी निवृत्ती वय ५८ वर्षे असल्याने त्याचा लाभ होत नाही. त्यामुळे राज्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सर्वदूर नाराजीची तीव्र भावना होत आहे. त्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६०वर्षे करावे, सरथीची विभागीय कार्यालय कार्यक्षम करावीत परदेशी शिक्षणाच्या सारथीच्या शिष्यवृत्ती करिता असणारी उत्पन्नाची मर्यादा काढून टाकण्यात यावी असेही मेटे यांनी नमूद केले.

बीडमधील गुन्हेगारीवर बोलताना ज्योती मेटे म्हणाल्या, सरपंच संतोष पान २ वर

# सामाजिक सलोख्याचे नवे पर्व

**कौतुकास्पद:** बाळा बांगरांच्या पुढाकाराने पहिले पाऊल! स्व.संतोष देशमुखांचे शाळेला नाव देण्याचा निर्णय




पुण्यभूमी पाटोदा

पाटोदा:बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोख्याचा संदेश देण्यासाठी विजयसिंह बाळा बांगर यांनी घेतलेला पुढाकार सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. पाटोद्यातील बांगर कुटुंबीय हे संघर्षातून उभं राहिलेलं, सामाजिक आणि सहकारी क्षेत्रात कार्यरत असलेलं कुटुंब. सामाजिक सलोखा आणि एकोपा जपण्यासाठी हे कुटुंब नेहमीच पुढे असतं, आणि त्याच परंपरेतून आता विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी समाजात सकारात्मकतेचा संदेश देत पुढील वाटचालीला सुरुवात केली आहे.

बाळा बांगर यांनी मस्साजोग गावात जाऊन स्व.संतोष अण्णा देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या नावाने एका शाळेला नाव देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय केवळ श्रद्धांजली नव्हे, तर समाजात समता, सलोखा आणि बंधुभाव वाढवण्याचं ठोस पाऊल आहे. या प्रसंगी सेवा सोसायटीचे संचालक सय्यद सज्राद, सचिन पवार यांच्यासह गावातील अनेक मान्यवर, तरुण, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.गावकऱ्यांच्या भावना उचंबळून आल्या जेव्हा रामकृष्ण बांगर साहेबांच्या आठवणी जाग्या झाल्या. सहकार क्षेत्रातील योगदानामुळे प्रत्येक गावात त्यांचं नाव पान २ वर

# सामाजिक सेवेचा यथोचित सन्मान

**अभिनंदनिय:**अजिंक्य जगदाळेंना पुरस्कार जाहीर

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड :जिल्ह्यातील साखरे बोरगाव चे सुपुत्र अजिंक्य जगदाळे हे सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. गोरगरिबांच्या अडचणीत धावून जाणारा अजिंक्य जगदाळे म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. याच कामाची पावती म्हणून युवा महाराष्ट्र फाउंडेशनने त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. युवा महाराष्ट्र फाउंडेशन प्रत्येक वर्षी महाराष्ट्रातील सामाजिक कार्य तसेच अनेक क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देत सन्मान करण्यात येतो यावर्षी बीड जिल्ह्यातील साखरे बोरगाव चे सुपुत्र अजिंक्य जगदाळे यांचे सामाजिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आलेला आहे. गावामध्ये त्यांनी अनेक गोरगरिबांना मदती तसेच अनेक प्रश्नांवर आवाज उठवत गावकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक तरुण आणि तडफदार नेतृत्व म्हणून अजिंक्य जगदाळे यांच्याकडे पाहिले जाते. सामाजिक कार्य असो किंवा कोणतेही कार्य असले की अजिंक्य जगदाळे हे पुढे होऊन करतात.ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण २०२५ चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिगजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड पान २ वर

# साक्षी कांबळेच्या न्यायासाठी आंदोलन!

**नितीन सोनवणे:**म्हणाले आरोपीला फाशी द्या

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:शहरामध्ये के एस के कॉलेजमधील शिकणारी मुलगी साक्षी कांबळे मृत्यू जबाबदार असणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी, बीड मधील के, एस, के महाविद्यालयातील मुली सुरक्षित नाहीत, मुलींचे शोषण करणारे रॅकेट एक्सपोज झाले पाहिजे. साक्षी कांबळे ला न्याय मिळाला पाहिजे. यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने दिनांक २३/०४/ २०२५ रोजी ठीक ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय दीपक भाई केदार यांच्या उपस्थितीमध्ये व बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वामध्ये आक्रोश न्याय आंदोलन करण्यात येणार आहे तरी पान २ वर

# केजमध्ये डान्स स्पर्धेचे आयोजन

**रोटरी क्लब:** नाव नोंदणीचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने केज शहर व तालुक्यातील कुशल व गुणी कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देण्याकरिता येत्या दि.१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून केज शहरातील हनुमान मंदिर (वकिलवाडी) समोरील प्रांगणात सायंकाळी ठीक ६ वाजता भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेत केज तालुक्यातील सर्व गुणी कलाकारांना आपली कला दाखवण्याची संधी दिली जाणार आहे.या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांना दि.२८ एप्रिल रोजी आपल्या डान्स ची रंगीत तालीम द्यावी लागेल. यामध्ये निवड होणाऱ्या कलाकारांनाच दि.१ मे रोजीच्या स्पर्धेत संधी दिली जाईल.रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता भोसले ब्रिलिअन्स क्लासेस केजच्या हॉल मध्ये पार पडेल.ही स्पर्धा चौथी ते सातवी व आठवी च्या पुढे खुला गट अशी दोन गटात होणार आहे.भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व कलाकारांनी आपली नावे व रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत देता येतील.त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही.इच्छुकांनी आपली नावे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी (व्यंकटेश ज्वेलर्स, कानडी रोड – ९८६०६५२४५४,सचिव आनंद तरकसबंद सहशिक्षक– ९४०४६९७४७५, ०८६६८४४७७४४,संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले ९४२३७३३८८८ प्रोजेक्ट चेअरमन रो. श्रीराम देशमुख सहशिक्षक– ९०७५७५४४४४ यांच्या कडे नोंदणी करावी. पान २ वर

# तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये पाणपोई!

**ऋणानुबंध:**युवराज गर्जेंचा आदर्श उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने तलवाडा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांचे पिण्याच्या पाण्यामुळे हाल होत असत या तहानलेल्या नागरिकांची तहान भागवण्यासाठी युवा नेते युवराज आदिनाथ (दादा)गर्जे यांच्या सौजन्याने व तलवाडा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहायक पोलिस निरीक्षक मा.सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पाणपोईची व्यवस्था करण्यात आली या पाणपोईचे उद्घाटन कर्तव्यदक्ष पान २ वर



# सामाजिक बांधिलकी जोपासली




पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडी गावचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने गावातील हनुमंत बालासाहेब मुंडे, गौतम संभाजी रोडे, वैजनाथ सोमीनाथ बहीरे, सुरेश बालासाहेब मुंडे यांच्या मुलींच्या विवाहासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये आर्थिक स्वरुपाची मदत करण्यात आली.यावेळी से.स.सो. चेअरमन मिनीनाथ दादा फड, रामहरी फड, कॉँग्रेस नेते प्रकाश मुंडे, बंडू मुंडे, माधवराव मुंडे, गुंडीबा फड, बंडू फड, ग्रा प. सदस्य प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, बाबासाहेब मुंडे, तौफिक कच्छी, महादेव मामा मुंडे, समाधान मुंडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्गाला पडल्या भेगा

**मागणी:**संबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:कळंब रस्त्यावरील महामार्गाला भेगा पडल्या आहेत तरी सुद्धा प्रशासन कुठल्याही प्रकारची दखल घेतली जात नाही केज कळंब राज्य रस्त्यावर भेगा पडल्या मुळे वाहन चालकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे तसेच केज कळंब महामार्गासाठी एम–४० ग्रेडचे सिमेंट वापरल्यास २० वर्षे खड्डे पडत नाही, असा दाव संमंधीत कंपनीवाल्यानी केला होता, मात्र आता तो फेल ठरला असल्याचे दिसत आहे. अधिकारी मात्र यावर बोलण्यास तयार नाहीत व केज कळंब रोडवर पडलेल्या भेगा मुळे मोठा खड्डा पडला आहे, त्यामुळे अपघाताची शक्यता आहे. महामार्गावर अपघात होण्याची शक्यता आहे व सिमेंट रस्त्यावर आडव्या भेगा लवकर दुरुस्त होतात, पण उभ्या भेगा कायमच्या पान २ वर

## परंपरा
## संत नामदेव महाराज यात्रा महोत्सव

# भक्तांनी ओढल्या मानाच्या बैलगाड्या!

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील होऊन गेलेले संत व ग्रामदैवत श्री संत नामदेव महाराज यांच्या यात्रेनिमित्त शनिवारी सात दिवसांचा उपवास करीत भक्तांनी गावातील देवी देवतांची पूजा करून श्री संत नामदेव महाराज की जय, अशा जयघोषात व गुलालाची उधळण केली. यावेळी भाविकांनी खचाखच भरलेल्या मानाच्या १२ बैलगाड्या मानाच्या भक्तांनी ओढल्या. चिंचोलीमाळी येथील ग्रामदैवत श्री संत नामदेव महाराज यांच्या यात्रा महोत्सवाला हनुमान जयंतीपासून प्रारंभ झाला. यानिमित्त आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात भागवत कथेसह हरीकीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. शनिवारी यात्रेच्या दिवशी सकाळपासून भाविकांनी श्री संत नामदेव महाराज मंदिरात श्रीफळ वाढवून साखरेची शेरणी वाटप केली. दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. हा सोहळा पाहण्यासाठी महिला, ग्रामस्थांसह भाविक मोठ्या संख्येने हजर होते.सात दिवसांपासून उपवास केलेल्या विजय गायकवाड, विशाल घोडके, विजय गलांडे, संदीप गलांडे, संजय घोडके, दादा घोडके या मानाच्या सहा भक्तांनी गावातील सर्व देवी देवतांची पूजा केली. त्यानंतर दुपारी मानाच्या बैलगाड्या दोरीच्या साहाय्याने एकमेकांना बांधून या बैलगाड्यात खचाखच भाविक बसल्यानंतर कमरेला कच्च्या सुताचा दोरखंड बांधून 'श्री संत नामदेव महाराज की जय' अशा जयघोषात गुलालाची उधळण करीत १२ बैलगाड्या ओढल्या आहेत.



# भुरट्या पुढाऱ्याला पडताहेत स्वप्न !

**बोंबला:**योजना गिळली आता पद हवे

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील टाकळी येथील एका भाजपच्या भुरट्या पुढार्यांला भाजपच्या तालुकाध्यक्ष पदाचे स्वप्न पडु लागले आहेत तरी नवल यांचे वाटत आहे की तालुक्यातील ३२ कोटींच्या योजना लुटुन स्वताच्या घशात घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या भुरट्या पुढार्यांना केंद्रीय पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदाचे स्वप्न पडतात कसे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण केज तालुक्यातील जलजिवन कामात एका भुरट्या गुत्तेदाराचा आका म्हणून काम करत कोट्यवधी रुपये खानारा भुरट्या गुत्तेदाराला चक्क भाजपच्या तालुकाध्यक्ष पदाचे स्वप्न बघन सुध्दा अतिशय निंदनीय प्रकार आहे एन उन्हाळ्यात केज तालुक्यातील १५ गावातील नागरिकांच्या घशाला कोरड पडली असताना योजनेचा निधी लाटुन तालुक्याला शेंगा हानत फिरत असणाऱ्या भुरट्या पुढाऱ्यांला भाजपचे तालुकाध्यक्ष पद देनार तरी कोण असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण भाजप